शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(खाजगी वितरण)

अंक जानेवारी २०२२

अंक क्र. ४९

Website : www.bhidekul.in

Email : office@bhidekul.in

वर्ष : 48 अंक : 260 कोल्हापूर सोमवार ता. 31 जानेवारी 2022 किंमत 2 रुपये ✲ पाने 4+4 Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## सुवर्ण विशेषांक - एप्रिल २०२२

# आवाहन

भिडे कुलाचे मुखपत्र 'आम्ही भिडे'चा पुढील ५० व्या अंकाच्या प्रकाशनाचे औचित्य साधून पुणे येथे एप्रिल २०२२ चा अंक प्रकाशन करण्याचे योजिले आहे. पुण्यातील प्रकाशनाची तारीख, वेळ आणि ठिकाण फेसबुक, व्हॉटसूअप, ई-मेलच्या माध्यमातून आपल्यापर्यंत नक्कीच पोचविणार आहोत.

'आम्ही भिडे' आगामी सुवर्ण विशेषांक वाचनीय व संग्रही जतन करण्याजोगा व्हावा ह्यासाठी भिडे बंधू-भगिनी, माहेरवाशिणी आणि हितचिंतकांची मदत अपेक्षित आहे. २००३ ह्या वर्षी सांगली भिडे कुलसंमेलनात पहिला अंक प्रकाशित झाल्यापासून आपण १७०० भिडे कुटुंबीय व हितचिंतकांपर्यंत विनामूल्य वितरित करीत आहोत. त्यादृष्टीने रंगीत, ब्लॅक ॲण्ड व्हाईट जाहिरात, बॅनर्सच्या माध्यमातून 'आम्ही भिडे' अंकासाठी आर्थिक मदतीचा हात मिळावा तसेच वैचारिक लिखाण पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन करीत आहोत. अंक ५० ते ६० पानांचा, मुखपृष्ठ व आतील काही पाने रंगीत असतील, ज्यायोगे हा अंक संस्मरणीय व संग्रही व्हावा ह्यासाठी आपल्या सर्वांच्याच मदतीची अपेक्षा आहे. ह्या अंकामध्ये लेखन देण्यासाठी काय अपेक्षित आहे ह्याची ढोबळमानाने माहिती देत आहे.

१) प्रतिष्ठानकडून आतापर्यंत अनेक पुरस्कार, अनेक क्षेत्रात दर्जेदार कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिले. त्या संदर्भात पुरस्कार स्वीकृत व्यक्तीने अथवा पुरस्कर्त्याने आपले मनोगत थोडक्यात द्यावे.

२) २००३ मध्ये सांगलीमध्ये पहिला 'आम्ही भिडे', भिडे कुलाचे संपर्क माध्यम म्हणून प्रकाशित झाला. त्या नंतरचा ४९ अंकांपर्यंतचा सुवर्ण टप्पा पूर्ण होत आला. ह्या सर्व वाटचालीत अनेकांनी आपले योगदान, मदत दिली त्यादृष्टीने आपले मत, अभिप्राय, सूचना ह्या थोडक्यात द्याव्यात.

३) १९९९ साली प्रतिष्ठानची मुहूर्तमेढ झाली, २००० साली भिडे प्रतिष्ठानची सरकारी दप्तरी नोंद झाली. भिडे कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती तयार करण्याचे ध्येय ठेवून सर्व भिडे मंडळींनी मदत केली, त्यावेळे पासून आजपावेतो अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष अशा अनेक पदांवर अनेकांनी कार्य केले आणि करत आहेत. त्यांच्या कार्याबद्दल काही प्रतिक्रिया जरूर द्याव्यात.

४) आजपावेतो १९ ते २० भिडे कुलसंमेलने वेगवेगळ्या ठिकाणी घेतली. त्यामध्ये मला भावलेले संमेलन, आठवणी, आपले संमेलनाबद्दलचे मनोगत, सूचना, कुल संमेलने का व कशासाठी अशा आशयाचे लेखन अपेक्षित आहे.

५) आपल्या कुलात अनेक कलाकार होते आणि आहेत. उदाहरणार्थ, नाट्यकर्मी, कीर्तनकार तसेच समाजकारण, राजकारण, अर्थकारण ह्यामध्ये कार्य करणाऱ्या किंवा कार्य केलेल्या व्यक्ती, तसेच संरक्षण, महसूल क्षेत्रात भारतात किंवा भारताबाहेर उल्लेखनीय कार्य केलेल्या व सध्या करत असलेल्या व्यक्ती, व्यावसायिक दृष्टीकोनातून पर्यटन, उद्योग, व्यवसाय, वकीली, डॉक्टर त्याचप्रमाणे आधारवड म्हणून कार्य करणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती, विज्ञान, छंद, प्रकल्प, साहित्य, वाङ्मय प्रकल्प ह्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देण्यासाठी विचार, त्यालाच अनुसरून कंपनी सेक्रेटरी, अभिनय, चित्रकला, कॉर्पोरेट क्षेत्रात भारत व राज्य सरकारमध्ये दर्जेदार कार्य करणाऱ्या व्यक्तींचा नामोल्लेख असावा.

५० वा सुवर्ण विशेषांक भिडे कुलभूषण प्रेरणा आणि स्मरण हा मुख्य हेतू आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याबद्दल आवर्जून उल्लेख असावा. **लेखन किंवा साहित्य देण्यासाठी भिडे प्रतिष्ठानच्या पुणे पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अथवा dilip.bhide15@gmail.com OR office@bhidekul.in** ह्या ई-मेलवर **शनिवार ता.५ मार्च २०२२ पर्यंत पाठवावे.** (पान २ वर)

## संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या नवनियुक्त विश्वस्तांची नुकतीच पहिली बैठक झाली. त्यामध्ये अध्यक्ष म्हणून **श्रीमान शशिकुमार केशव भिडे** यांची एकमताने निवड करण्यात आली. पुढील पदाधिकारी खालीलप्रमाणे.....


| | |
|---|---|
| १) श्री. शशिकुमार केशव भिडे, पुणे | विश्वस्त, अध्यक्ष |
| २) श्री. चंद्रकांत शंकर भिडे, ठाणे | विश्वस्त, कार्याध्यक्ष |
| ३) श्री. प्रभाकर शंकर भिडे, डोंबिवली | विश्वस्त, उपाध्यक्ष |
| ४) श्री. दिलीप वासुदेव भिडे, पुणे | विश्वस्त, सचिव |
| ५) श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे | विश्वस्त, कोषाध्यक्ष |
| ६) ले.क.(नि.) सुनिल वासुदेव भिडे, पुणे | विश्वस्त, उपसचिव |
| ७) श्री. प्रशांत सदानंद भिडे, सातारा | विश्वस्त, उपकोषाध्यक्ष |
| ८) श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली | विश्वस्त |
| ९) श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे | विश्वस्त |
| १०) सौ. संपदा राजेंद्र भिडे, मुंबई | विश्वस्त |
| ११) श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे | विश्वस्त |

**सूचना :** आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती -
**TJSB सहकारी बँक लि; सदाशिव पेठ शाखा, पुणे-30.**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,**
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018
विशेष सूचना - रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सअॅप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

आम्ही भिडे **अंक ४९ वा**

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे
कार्यकारी संपादक : श्री. दिलीप भिडे
संपादक मंडळ : ले. क. सुनिल भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रभाकर शंकर भिडे, श्री. राजेंद्र भिडे, श्री. विनायक वि. भिडे, सौ. प्रिती भिडे, सौ. स्नेहल भिडे, श्री. माधव पु. भिडे
सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, श्री. शंतनु नि. भिडे, के. मो. भिडे, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड,
दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.
१) श्रीमती इंदुमती राजाराम भिडे, मुंबई. २) श्रीमती सुशिला गंगाधर भिडे, कल्याण. ३) श्रीमती मालती प्रभाकर भिडे, कोल्हापूर. ४) श्री. आनंद मोरेश्वर भिडे, चिपळून

## सुवर्ण विशेषांक - एप्रिल २०२२ (पान १ वरुन)

लेखन मुद्देसूद व शक्यतो थोडक्यात असावे. त्यावर आपले पूर्ण नाव, संपर्क क्रमांक, आयडेंटीटी साईज रंगीत फोटोसह पाठवावे.

आपल्या वैचारिक मदतीबरोबर आर्थिक मदत जाहिरात, देणगी, बॅनर्स ह्या माध्यमातून मदतीची अपेक्षा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्णपान रंगीत जाहिरात | ५,००० रु. | पूर्ण पान **B/W** | ३,००० रु. |
| अर्धे पान **B/W** | १,५०० रु. | पाव पान **B/W** | ८०० रु. |
| बॅनर्स (गुंडाळी फलक) | ५,००० रु. | | |

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !**

| | | |
|---|---|---|
| **जानेवारी** | श्री. सतीश व सौ. स्मिता भिडे, पुणे | २-१-१९८१ |
| **फेब्रुवारी** | श्री. प्रदीप व सौ. गौरी भिडे, डोंबिवली | १९-२-१९९५ |
| | श्री. उमेश व सौ. अपर्णा भिडे, ठाणे | २४-२-१९७३ |
| | श्री. मुकुंद व सौ. मीना भिडे, चिपळूण | २३-२-१९९१ |
| | श्री. मधुकर व सौ. नीला भिडे, मालाड | २८-२-१९७० |
| | ॲड. प्रशांत व सौ. प्रज्ञा भिडे, दादर | २२-२-२००२ |
| **मार्च** | श्री. दिलीप व सौ. वर्षा भिडे, पुणे | १२-३-१९८५ |
| | श्री. राजेंद्र व सौ. संपदा भिडे, दादर | २३-३-१९९८ |

## अभिप्राय

ऑक्टोबर २०२१ चा आम्ही भिडे अंक मिळाला. नेहमीसारखाच दर्जेदार होता. लेखन स्पर्धेतील लेख उत्तम व वाचनीय आहेत. सौ. अनघा भिडे यांचा 'बापमाणूस' लेख खूपच आवडला. अशी अनेक माणसे आपल्या समाजाने दिली आहेत हे आपले पूर्ववैभव आहे. धन्यवाद !

**- अरुण आर. गोडबोले,** शनिवार पेठ, सातारा.

ऑक्टोबर २०२१ चा आम्ही भिडे अंक मिळाला. अंक वाचनीय आणि लक्षवेधी आहे. कै. दामुकाका यांच्यावर त्यांच्या कन्येने लिहिलेला लेख त्यांची आठवण जागृत करून गेला व डोळे पाणावले. तसेच श्रीमती उज्ज्वला साठे यांच्या आठवणीने आमच्यावर गुदरलेल्या त्या दिवसाच्या आठवणी व प्रसंग डोळ्यांसमोर उभे राहिले.

**- प्रभाकर वासुदेव भिडे,** डोंबिवली (प.)

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ देणगीदार

| | | रुपये |
|---|---|---|
| १) | श्रीमती सुशिला प्रभाकर भिडे, पुणे | २५,००० आश्रयदाता |
| २) | सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे | १,००० आजीव सभासद |
| ३) | श्री. प्रशांत सुरेश भिडे, पुणे | १,००० आजीव सभासद |
| ४) | सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे | १,००० देणगी |
| ५) | सौ. शैलजा अरविंद वाडदेकर, तळेगांव दाभाडे | ५०० देणगी |
| ६) | सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे | ३०० देणगी |

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

# भिडे प्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## जानेवारी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. श्रीकांत प्रभाकर भिडे, रोहा | १ |
| २. | श्री. प्रभाकर शंकर भिडे, सोलापूर | १ |
| ३. | श्री. विश्वनाथ दिवाकर भिडे, पुणे | १ |
| ४. | श्री. केदार विनय भिडे, पुणे | १ |
| ५. | श्री. वसंत मोरेश्वर भिडे, पुणे | ३ |
| ६. | श्रीमती वीणा वसंत भिडे, ठाणे | ३ |
| ७. | श्री. मिलींद संतोष भिडे, सांगली | ५ |
| ८. | श्री. चिन्मय श्रीकृष्ण भिडे, पुणे | ६ |
| ९. | श्री. कौस्तुभ प्रदीप भिडे, डोंबिवली | ६ |
| १०. | श्री. गजानन सदाशिव भिडे, पुणे | ९ |
| ११. | सौ. चित्रा विजय भिडे, भोपाळ | ११ |
| १२. | श्री. संदीप कृष्णराव भिडे, बेळगांव | ११ |
| १३. | श्री. प्रसन्न भास्कर भिडे, मुंबई | १२ |
| १४. | सौ. सुकृता संदीप भिडे, अंमळनेर | १२ |
| १५. | श्री. विलास विठ्ठल भिडे, देवगड | १३ |
| १६. | श्री. मकरंद दत्तात्रय भिडे, पंढरपूर | १४ |
| १७. | डॉ. विजय कृष्णा भिडे, भोपाळ | १५ |
| १८. | सौ. शैलजा अरविंद वाडदेकर, पुणे | १५ |
| १९. | डॉ. विवेक यशवंत भिडे, रत्नागिरी | १६ |
| २०. | श्री. कैलास जगदीश भिडे, मुंबई | १९ |
| २१. | श्री. नारायण वसंत भिडे, जबलपूर | २० |
| २२. | श्री. मंदार श्रीकृष्ण भिडे, पुणे | २२ |
| २३. | सौ. विद्या विकास भिडे, सांगली | २२ |
| २४. | श्री. प्रसाद माधव भिडे, माभळे | २२ |
| २५.. | श्री. उमेश विठ्ठल भिडे, ठाणे | २३ |
| २६. | श्रीमती कुसुम नारायण नगरकर, पुणे | २४ |
| २७. | श्री. प्रतापसिंह विष्णुपंत भिडे, नाशिक | २४ |
| २८. | सौ. विद्या चिंतामणी भिडे, ठाणे | २५ |
| २९. | श्री. विलास राजाराम भिडे, मुंबई | २५ |
| ३०. | श्री. मधुकर शंकर भिडे, रायगड | २६ |
| ३१. | श्रीमती मनाली भिडे, पुणे | २८ |
| ३२. | श्री. परीक्षित सुहास भिडे, पुणे | ३० |

## फेब्रुवारी

| | | |
|---|---|---|
| १. | कु. राजस प्रदीप भिडे, पुणे | २ |
| २. | श्री. संजय दत्तात्रय भिडे, कोल्हापूर | ३ |
| ३. | श्री. सारंग शरद भिडे, पुणे | ५ |
| ४. | श्री. मंदार भगवान भिडे, रत्नागिरी | ७ |
| ५. | श्री. विजय अरविंद भिडे, पुणे | ८ |
| ६. | श्री. विद्याधर शंकर भिडे, डोंबिवली | ८ |
| ७. | श्री. शरद नारायण भिडे, पुणे | ९ |
| ८. | सौ. गौरी श्रीगणेश जोगळेकर, कल्याण | ९ |
| ९. | श्री. निनाद दत्तात्रय भिडे, ठाणे | ९ |
| १०. | कु. ईरा हर्षवर्धन भिडे, पुणे | १० |
| ११. | श्री. विश्वनाथ रघुनाथ भिडे, कामशेत | १० |
| १२. | श्री. जयंत शंकर भिडे, ग्वाल्हेर | ११ |
| १३. | सौ. मृणाल शार्दुल भिडे, पुणे | १२ |
| १४. | सौ. सुजाता प्रसन्न भिडे, मुंबई | १३ |
| १५. | सौ. कल्पना संजय भिडे, माणगांव | १५ |
| १६. | श्री. विकास कृष्णाजी भिडे, कल्याण | १५ |
| १७. | श्री. प्रसाद प्रसन्न भिडे, पुणे | १५ |
| १८. | सौ. सायली सचिन भिडे, अंमळनेर | १६ |
| १९. | सौ. गौरी हर्षवर्धन भिडे, पुणे | १७ |
| २०. | श्री. उदय गजानन भिडे, देवरुख | १७ |
| २१. | श्री. श्रीराम वामन भिडे, पुणे | १८ |
| २२. | श्री. अमित प्रकाश भिडे, डोंबिवली | १८ |
| २३. | श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे | १९ |
| २४. | श्री. विनायक केशव भिडे, रायगड | २० |
| २५. | श्री. संतोष सखाराम भिडे, डोंबिवली | २० |
| २६. | श्री. सागर गजानन भिडे, सांगली | २० |
| २७. | श्री. वसंत नरहर भिडे, ठाणे | २१ |
| २८. | श्रीमती सुलभा दिनकर भिडे, कल्याण | २२ |
| २९. | श्री. प्रकाश प्रभाकर भिडे, माभळे | २३ |
| ३०. | श्री. बाळकृष्ण दामोदर भिडे, पुणे | २४ |
| ३१. | सौ. मानसी मुंकुंद भिडे, बेळगांव | २५ |
| ३२. | श्री. माधव आनंद भिडे, डोंबिवली | २५ |
| ३३. | सौ. स्नेहल विजय भिडे, ठाणे | २६ |
| ३४. | श्री. विक्रांत दिलीप भिडे, पुणे | २७ |
| ३५. | ॲड. विनोद यशवंत भिडे, औरंगाबाद | २७ |

## मार्च

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रसाद रमेश भिडे, कल्याण | १ |
| २. | श्री. मिलींद सोमेश्वर भिडे, बडनेरा | १ |
| ३. | सौ. अंजली विवेक भिडे, सांगली | २ |
| ४. | कु. स्वानंद श्रीकांत भिडे, रोहा | ४ |
| ५. | सौ. प्रज्ञा संतोष भिडे, ठाणे | ४ |
| ६. | सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर | ५ |
| ७. | श्री. प्रभाकर महेश्वर भिडे, कणकवली | ६ |
| ८. | श्री. काशिनाथ लक्ष्मण भिडे, सोलापूर | ७ |
| ९. | श्री. अमित ए. भिडे | ७ |
| १०. | श्री. मिलींद मुकुंद भिडे, पुणे | ७ |
| १२. | श्री. सुधीर केशव भिडे, पुणे | ८ |
| १३. | सौ. शकुंतला मधुकर भिडे, रायगड | १० |
| १३. | श्री. विश्वनाथ गोविंद भिडे, पुणे | ११ |
| १४. | कु. वेदांगी दिलीप भिडे, पुणे | १४ |
| १५. | सौ. रोहिणी प्रभाकर भिडे, पुणे | १५ |
| १६. | श्रीमती वनिता नरसिंह भिडे, पुणे | १५ |
| १७. | सौ. मधुरा महेश भिडे, पनवेल | १५ |
| १८. | श्री. बाळकृष्ण ल. भिडे, कर्नाटक | १६ |
| १९. | श्री. सुदर्शन सुरेश भिडे, पुणे | १६ |
| २०. | श्री. शरद शंकर भिडे, सांगली | १७ |
| २१. | श्री. सुनील वामन भिडे, पुणे | १७ |
| २२. | सौ. अनुराधा नरेंद्र भिडे, सांगली | १८ |
| २३. | श्री. संजय भिडे, मुंबई | १९ |
| २४. | श्री. शिरीष सुरेश भिडे, उत्तरप्रदेश | २० |
| २५. | श्री. दिनानाथ पांडुरंग भिडे, ठाणे | २३ |
| २६. | श्री. अनय विजय भिडे, ठाणे | २३ |
| २७. | श्री. तनय विजय भिडे, ठाणे | २३ |
| २८. | श्री. एम. उपेंद्र भिडे, बेंगलोर | २४ |
| २९. | श्री. मा. य. भिडे, हैद्राबाद | २५ |
| ३०. | श्री. अक्षय चारुदत्त भिडे, माभळे | २७ |
| ३१. | सौ. स्वाती अजय भिडे, पुणे | ३० |
| ३२. | सौ. आशा अनिल भिडे, भोपाळ | ३० |
| ३३. | श्री. महादेव जनार्दन भिडे, मुंबई | ३० |
| ३४. | श्री. अभिषेक विजय भिडे, पनवेल | ३१ |
| ३५. | सौ. राधिका श्रीधर रानडे, पुणे | ३१ |
| ३६. | श्री. अमोल शशिकांत भिडे, पुणे | ३१ |

**कु. करुणा भिडे , डोंबिवली यांच्या विविध कविता...**

## चांदणे

अचानक त्या सायंकाळी
मेघांच्या गर्दीतुनी सुटुनी
आला रात्रीच्या शोधात
चमचमीत रात्र बनुनी
हिऱ्यासम त्या चांदण्यांनी
उजळुनी टाकले मन
त्या गर्द रजनीतील चंद्रासंग
संवाद साधी वन
कोमल चांदणझाडावरली
अंधारपर्णे झडती
त्या चंद्रकलेसाठी
नभही अपुरे पडती
कसे करावे वर्णन
नभात शब्द हरवती
आभाळातल्या चंद्रासम
नाही कुठली सौंदर्यवती
भल्या पहाटे एकाएकी
निसटून गेली चांदणी
वाट पाहू दिवसभर
जाऊ रात्रीच्या नभांगणी
- करुणा भिडे

## जन्मसण

जीवनाचा चंद्र शोधण्या
अंधाराची झालर बनू
वेळप्रसंगी होऊ सूर्यही
सुखकिरणांची मखमल विणू
नाती जपून, माणसे जोडून
जगण्याचे पुस्तक लिहूया
बनवून एक संग्रह त्यांचा
कर्तव्याचे भान ठेवूया
स्वभावाच्या पदार्थात असावे
गोडाचे प्रेममय सारण
व्हावे आपण आयुष्यात
कुणाच्या सुखाचे कारण
सांभाळून घ्यावा आपण
पाप, पुण्याचा तोल
एकची मिळे जन्म
असंख्य लक्षी त्याचे मोल
शोधत राहावा कायम
आपल्या अस्तित्वाचा अर्थ
उत्तर मिळाले की होईल
जीवन आपुले सार्थ

## मोदक

हा छोटासा मोदक
खाद्य प्रिय बाप्पाचे
लहान मोठ्या सर्वांच्याच
असतात खूप आवडीचे
पीठ मळून सारण करून
कळ्या पाडाव्या छान
मोदक, दूर्वा, जास्वंद
बाप्पाचा साधासुधा मान
मोद म्हणजे आनंद
क म्हणजे कर्म
मोदकाचे सेवन
असे आनंदाचे मर्म
मोदक बनवला की
असतो खाणाऱ्यांना मेवा
मोदकासोबत करंजीचा
जोडा म्हणजे गोडवा
आयुष्याच्या मोदकात भरू
आनंद व यशाचे सारण
बाप्पाच्या आशीर्वादाने
नष्ट करू दुष्टतेचे आवरण

## गुढीपाडवा

गुढीपाडवा म्हणे आनंद, उत्साह हर्ष
नवउमेदीने नटलेले जल्लोषाचे हिंदू नववर्ष
गुढीतील त्या कडुनिंबाचा आदर्श आम्ही घेऊ
ह्या महामारीवरी मात करुनी सक्षम, सदृढ होऊ
आयुष्यातील राग, द्वेषाची पुसून टाकू ओळ
भरू गोडवा नात्यात बांधू साखरमाळ
उदास त्या जीवनाचे संपवू जुने पर्व
गुढीतील त्या वस्त्रासम रंगीन होऊ सर्व
कष्ट आणि प्रयत्नांची फुले गुंफुनी चार
होईल त्यानंतर आपुला सुखी जीवनाचा हार
अपयशाच्या गर्द दरीतुनी मारू आता उडी
त्या नव्या शिखरावरी उभारू
उंच यशाची गुढी

## पुनःश्च

हाती घेऊ नव्या मशाली
जाळून टाकू अंधाराला
विवाद टाळून साद घालूया
चैतन्याचानव विश्वाला
एक होऊनि जगात साऱ्या
आदर्श नवा घालुनी देऊ
संकटकाळी साथ देऊनि
दुःखावर सुखकर्ता होऊ
माणुसकीच्या दिव्यात आज
एकजुटीची वात लावू
हात देऊनी हातांमध्ये
संकटावरी चाल करू
या जीवनाच्या युद्धातली
तलवार आपण बनू
स्वच्छंदी होऊनि दुनियेमध्ये
मुक्त संचार करू
नसे कुणाची भीती आम्हाला
निडर करू सामना
आनंदी व्हावे जग सारे
आहे आशेची मनोकामना

## सोन्याची दिवाळी

अंधार सागरी उसळली
लखख उजेडी लाट
लाटेत सामावले विश्व
जाहली दिवाळी पहाट
कसे मापावे सौंदर्य तयाचे
शब्दच नाही उरले
या जन्माच्या प्रवासातले
काळोखे दिन सरले
उजळुनी टाकू समई
पेटवू आनंदाच्या वाती
त्या ज्योतीसम तेवत राहो
आपुलकीची नाती
फटाक्याच्या आवाजात
होऊया सर्व दंग
नकोशी ती शांतता
होईल आपोआप भंग
कंदील लावुनी उत्साहाचे
एकीची रांगोळी रंगवू
सौंदर्याचे तोरण बांधुनी
मनातली अंधारी घालवू

## आयुष्य असे असावे

साथ असावी प्रयत्नांची
संयमाचे वृक्ष रुजावे
आनंदाचे घेऊ विसावे
आयुष्य हे असे असावे
कशा कुणाची चिंता आता
कुणी हसावे, कुणी रडावे
मी रचलेल्या कवितेसम
आयुष्य हे असे असावे
जिंकल्याचा नको अहंकार
हरल्याचे ही दुःख नसावे
एकुलत्या त्या जीवनातले
आयुष्य हे असे असावे
स्पर्धेच्या जाळ्यातुन सुटुनी
निर्मळतेच्या झऱ्यात वहावे
निराशेतली आशा शोधत
आयुष्य हे असे असावे
बनवूया आकाश आपुले
स्वातंत्र्याचे पंख विणावे
यशाची उंची शोधणारे
आयुष्य हे असे असावे

## गुरू

हातात आलेल्या पुस्तकाचा
अर्थ शिकवला ज्यांनी
आजचा दिन करू साजरा
प्रथम त्यांना वंदुनी
आमच्या साध्या जमिनीत
ज्यांनी ज्ञानबीज पेरले
आज त्यांच्याच मार्गदर्शनाने
झुडपांचे वृक्ष झाले
आनंद, अभ्यास
शिक्षणसंस्कारांचे दाता
गुरू म्हणजे पहिली
ज्ञानाची देवता
ज्ञानाचे ग्रहण करुनी
करू अज्ञानाचा नाश
अंधाराच्या वाटेमधला
गुरूच एक प्रकाश

# अंक परत येणारे पत्ते

गेल्या वर्षात आम्ही भिडे अंक बदललेला पत्ता, मयत, राहात नाहीत इत्यादी अन्य कारणाने अंक परत येत आहेत. आमच्याकडे परत आलेल्या अंकांचे पुर्नवितरण केले जाणार नाही. परंतु आपल्या माहितीकरिता खाली दिलेल्या यादीनुसार खालील व्यक्तींनी आपला नवीन अथवा बदललेला पूर्ण पत्ता आम्हाला लेखी पत्राने किंवा मेसेज करून मोबाईलवर कळविल्यास पुढील अंक वितरण अथवा पत्रव्यवहार सदर पत्त्याप्रमाणे केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. **दिलीप भिडे, पुणे 9657541236, ले.क. सुनिल भिडे, पुणे 9623017444**

**७०७४ सुबोध बाळकृष्ण भिडे,**
टाईप ४, १०/०३, एचओसी कॉलनी,
पोस्ट रसायनी, जि. रायगड.

**७५६९ दिगंबर नारायण भिडे,**
जी.चाळ, रूम नं. १, वल्लभनगर,
जुने एल.आय.सी. ऑफिस,
बोरिवली (प.), मुंबई.

**७१४० मुकुंद महादेव भिडे,**
ए/३, सहकार बिल्डिंग,
जानकी हॉटेल मागे, कल्याण रोड,
डोंबिवली (पूर्व), ४२१ २०१.

**७५८८ सुधाकर शंकर भिडे,**
५, कावेरी, परदेसी आळी,
श्री लॉजच्या मागे, पनवेल, जि. रायगड.

**७०९० धनंजय काशिनाथ भिडे,**
ए-२१२, एच.ओ.सी. पोस्ट, रसायनी,
पनवेल, जि. रायगड.

**७३२९ विनायक जनार्दन भिडे,**
वेसुर्ले, रत्नागिरी.

**७०८२ शरद गजानन भिडे,**
१३, हरणे बिल्डिंग, विष्णुनगर,
डोंबिवली (पश्चिम), ठाणे.

**३००५ भालचंद्र रावजी भिडे,**
द्वारा - रवींद्र भिडे, श्रीरामचंद्र अपार्टमेंट,
लक्षीबाई बागेजवळ, कल्याण, ठाणे.

**७१३० बळवंत शंकर भिडे,**
८, पुष्पक को-ऑप. सोसायटी,
भास्कर कॉलनी, नवपाडा, ठाणे (पश्चिम).

**३०७० शेखर केशव भिडे,**
११, शाकुंतल अपार्टमेंट,
कोथरुड बस स्टँड समोर, पुणे-४११ ०२९.

**७१३२ जयवंत अनंत भिडे,**
७, शितल को-ऑप. हौसिंग सोसायटी,
पहिला मजला, पखाडी, खारगाव नाका,
कळवा, ठाणे - ४०६०५.

**७६४४ विजया वसंत भिडे (भागवत)**
२९/९, स्नेहल कॉम्प्लेक्स,
फ्लॅट नं. ३, मंत्रीपार्क जवळ,
तेजसनगर, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.

**७६४५ विक्रम वसंत भिडे,**
२९/९, स्नेहल कॉम्प्लेक्स,
फ्लॅट नं. ३, मंत्रीपार्क जवळ,
तेजसनगर, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.

**सचिन अनंत भिडे**
सर्व्हे नं. २९/३/२, स्वस्तिश्री, बी/१,
मंत्रीपार्क जवळ, कोथरुड, पुणे-३८.

**७०८३ श्रीनिवास केशव भिडे,**
५०, श्रीनगर कॉलनी, आनंद बझार,
कंकड रोड, इंदौर, मध्यप्रदेश - ४५२ ००१.

**७५६८ प्रभावती केशव भिडे**
४०, श्रीनगर कॉलनी, आनंद बझार,
कंकड रोड, इंदौर, मध्यप्रदेश - ४५२ ००१.

**७०५७ विनायक माधव भिडे**
बी-२९३, रेट्रो केमिकल टाऊनशिप,
नागोठणे, जि. रायगड.

**३१२९ यशवंत श्रीपाद भिडे,**
८१/६, गादिया इस्टेट,
चंद्रगुप्त सोसायटी, पौड रोड,
कोथरुड, पुणे - ४११ ०२९.

**७४३४ चंद्रशेखर रवींद्र भिडे,**
१९७७, माडिवाले कॉलनी,
सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

**७४०४ बाळाराव रामचंद्र भिडे,**
९७, वसंतदादा औद्योगिक वसाहत,
चंद्रशेखर इंजिनिअरींग इस्टेट,
सांगली ४१६४१६.

**३२६८ अशोक बाबुराव भिडे,**
९७, वसंतदादा औद्योगिक वसाहत,
चंद्रशेखर इंजिनिअरींग इस्टेट,
सांगली ४१६४१६.

**३२८६ रवींद्र श्रीनिवास भिडे,**
बी/९/८, गुरु गणेशनगर, कोथरुड,
पुणे - ४११ ०३८.

**७३८७ माणिक गोपाळ भिडे,**
राका बिल्डिंग, इस्टेट कॉलनी,
वेटल नगर, कोथरुड, पुणे - ४११ ०२९.

**७४९१ सौ. प्रमिला केशव भिडे (गोखले)**
द्वारा - डॉ. नान्वी कुलकर्णी, ९ अमोद,
अंकुर, जे बिल्डिंग, तिसरा मजला, कोथरुड,
पुणे - ४११ ०२९.

**७२८५ अनुपम केशव भिडे,**
बंगला नं. ५, मंत्री किशेर पार्क,
भोसले नगर, पुणे-४११००७.

**२०३० केशव काशिनाथ भिडे,**
ए/५/६, मंत्री किशेर पार्क,
भोसले नगर, पुणे-४११००७.

**७१६९ कृष्णा गोविंद भिडे,**
द्वारा : श्रीमती सुनीता अरुण हिरवे,
भारद्वाज बंगला, वारजे गांव,
तपोधामजवळ, पुणे.

**७५५६ सुरेश श्रीपाद भिडे,**
बेळगांव.

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक २२

# फोर्थ स्टँडर्ड आणि बक्षीस

- आदित्य चंद्रकांत भिडे,
दादर



प्रत्येकाच्या आयुष्यात अशा काही गोष्टी घडतात ज्या कधीही विसरण्यासारख्या नसतात. काही चांगल्या काही वाईट पण त्या आयुष्यभर लक्षात राहतात. त्या आठवणींचा खजिना प्रत्येकाकडे असतो. अशा आठवणी म्हणजे एक चिमुकले विश्वच असते. मी पण त्याला अपवाद नाही. अशीच एक आठवण म्हणजे शाळेमधलं चौथीचं वर्ष. माझ्या शालेय जीवनामधले सगळ्यात रुबाबदार आणि लक्षात राहण्यासारखं वर्ष. तसा मी अभ्यासात अॅव्हरेज स्टुडंट होतो. पण त्या वर्षी काय माहिती काय झाले इतर इयत्तांपेक्षा जास्तच गुण मिळाले होते. पण त्याहून अधिक आश्चर्य म्हणजे पहिल्या युनिट टेस्ट, टर्मिनल्स, दुसरी युनिट टेस्ट आणि अॅन्युअलसमध्ये चक्क पहिला नंबर आला होता. जे कधी घडलं नव्हतं ते घडलं. आपण एकदम खूष आणि त्याहून जास्त घरचे खूष. कारण हे पहिल्यांदाच अनुभवत होतो. प्रत्येक परीक्षेच्या निकालाच्या वेळी आमच्या वर्गशिक्षिका वर्गात पहिल्या तीन आलेल्या विद्यार्थ्यांचे नाव अनाऊन्स करायच्या. त्या वेळी स्वतःचे नाव ऐकतानाचा अनुभव वेगळाच असायचा. अॅन्युअल परीक्षेच्या निकालाच्या वेळी पालकांना पण बोलावले होते. आईबाबांबरोबर वर्गात आलो तेव्हा फळ्यावर त्यांनी माझे नाव वाचले आणि थोडे इमोशनल झाले. वर्गशिक्षिकांना पण भेटले. नंतर सगळ्यांशी बोलत होतो. वर्गशिक्षिका प्रत्येकाला प्रगतीपुस्तक देत होते आणि त्यांच्या पालकांशी मुलांबद्दल बोलत होते. त्यांनी सांगितले की पहिल्या तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांसाठी स्पेशल बक्षीसे आहेत. आम्ही खूष झालो. त्यांनी आम्हाला त्यांच्या कपाटामधून आमची बक्षिसे घ्यायला सांगितली. तिसऱ्या क्रमांकासाठी त्यांनी पाचवीचे सायन्सचे पुस्तक दिले बक्षीस म्हणून. दुसऱ्या क्रमांकासाठी त्यांनी पाचवीचे सायन्स आणि इंग्लिश अशी दोन पुस्तके दिली बक्षीस म्हणून. आणि पहिल्यासाठी म्हणजे माझ्यासाठी पाचवीचे सायन्स, इंग्लिश आणि गणित ही पुस्तके दिली बक्षीस म्हणून. हे आम्हाला मिळालेले सगळ्यात आठवणीतील बक्षिसांपैकी होते. आम्ही वर्गशिक्षिकांचा आशीर्वाद घेतला आणि त्यांनीही भरभरून आशीर्वाद दिले. आयुष्यभर सोबत राहणारी अशी एक आठवण मनामध्ये जपून ठेवली आहे. आय होप तुम्हाला पण तुमच्या आठवणीतल्या खजिन्यापैकी खूप गोष्टी आठवल्या असतील.

---

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक ३०

# शेजारी : माझं कुटुंब

- सौ. गार्गी भिडे, पनवेल
८४५२०४०९३२

अलीकडेच आमचे शेजारी घर सोडून गेले आणि एक पोकळी निर्माण झाली. नवीन शेजाऱ्यांशी आजपर्यंत एकच वाक्य बोलले असेन. हे फ्लॅट सिस्टीम काही मला अजून गळी उतरलं नाही, हेच खरं. दार बंद करून बसणं, याची सवय नाही हो, मंडळी.



त्याचं काय झालं माहीत आहे का ? आमचं लहानपण गेलं एका वाड्यात. त्या काळी तो पाच मजली वाडा होता. नावच 'कैवल्य शिखर'. एका खोलीचे घर हो. आमचे बाबा लग्नाआधी एका मित्राबरोबर राहायचे, तिथेच नंतर पण राहिले. अगदी मी बारावी होईपर्यंत. सतरा कुटुंबं आणि आमचे घरमालक. त्यात स्वतः घरमालक आणि सावंत म्हणून एक कुटुंब होतं त्यांच्या दोन खोल्या, बाकी सगळेच एका खोलीत. तसे वाड्यात खेळायला वगैरे मोठी जागा नव्हती, पण जवळपास मैदान, मंदिर, नदी असं सगळे होते. थोडक्यात काय तर आम्ही अठरा कुटुंबे एकत्र राहात होतो म्हणा ना !

आमच्या शेजारी आधी कोण राहात होते ते आठवत नाही, पण नंतर अभ्यंकर म्हणून एक राहायला आले आणि त्यांची माझ्यापेक्षा मोठी मुलगी आणि मी दोघींची टोपण नावं एकच निघाली. गंमतच झाली. मग मी लहान असल्याने बिटकी चिंगी आणि ती मोठी चिंगी असं नामकरण झालं. त्यांच्या बाजूला कारेकर आणि मग आमचे घरमालक तानंगकर. अर्थात आमच्यासाठी हे मामा-मामीच होते. आई कधी घरी नसेल तर बिनधास्त त्यांच्याकडे जेवायला जायचो. तसं तर सगळीच घरे आपलीच होती म्हणा. खेळायला एकत्र, कुठे जायचे असेल तर एकत्र. इथे वयाचा कधी त्रास झाला नाही. सगळी मुले एकत्र असायचो. कितीतरी गमतीजमती असायच्या. एकत्र पत्ते खेळणं असायचे. शेजाऱ्यांचे नातेवाईक पण आपलेच असायचे.

आमच्या शेजारी अभ्यंकर आजी असायच्या. त्यांना तर आम्ही जकात नाकाच म्हणायचो. दृष्टी थोडी अधू होती पण असे कोणी आमच्या घरी येऊ शकायचे नाही. आमच्या घरी पूर्ण चौकशी झाल्याशिवाय कोणी प्रवेशच करू शकत नसायचे. पण आम्ही नसताना, असेच कोणी परतही जायचे नाही. त्यांचा चहापाणी दिल्याशिवाय त्या सोडायच्या पण नाहीत. आमच्या आणि त्यांच्या घरामध्ये दार होते. कुठला समारंभ वगैरे असेल तर हे मधलं दार आम्ही उघडायचो. मला आठवतंय, एकदा आई दादाला ट्रेनला पोहोचवायला गेली होती आणि तिथे एक ओळखीच्या भेटल्या. ज्यांचा भाऊ दवाखान्यात होता म्हणून त्या जाणे रद्द करणार होत्या. पण आई म्हणाली, मी रात्री दवाखान्यात थांबते, तुम्ही जा. बाबा पण परगावी होते. त्या रात्री आमच्या घरी सगळी माझ्या सोबतीला आली. सकाळी शुभाताईने माझे आवरून दिले. खायचे बघितले. तर असे हे आमचे शेजारी.

पन्हाळ्याला आम्ही दरवर्षी जायचो. खूप मजा असायची. आम्ही वाड्यामुळे खूप सुरक्षित आयुष्य जगलोय. आमच्या इथेच खाली एक डेअरी होती. मालगावे यांची. ते पण आमच्या वाड्यात राहायचे. पण कधी वागण्यात मोठेपणा नव्हता. जोशी कुटुंब, त्यांची मुले आणि आम्ही एकाच शाळेत. जाता येता एकत्र असायचो. कुणाशी भांडण झाले की त्याचे नाव घ्यायचे नाही. मग समेट झाला की दोघांनी एकमेकांची नावे एकदम घ्यायची, अशी मज्जा असायची.

मला आठवतंय, कुणाला बघायला मुलगा येणार असेल, तरी आम्ही तिथे पण असायचो. अगदी मुक्त संचार असायचा बच्चे कंपनीचा वरच्या मजल्यावर एक राहायचे, ज्यांच्याकडे रगडा होता आणि तो फिरवायला सुरू झाला की जमीन हादरायची. तिथेच बाजूला एक उपळावीकर म्हणून राहायचे. त्या मावशीचे नाव मंगल. मग आम्ही कधी कधी गणपतीबाप्पा मोरया, मंगलमावशी मोरया, असे म्हणायचो. तिथेच बाजूला एका खोलीत एक खटावकर कुटुंब, ज्यांच्या मुलीला धर्मेंद्र म्हणजे परब्रह्म वाटायचा. त्यांनी छोटा टीव्ही आणला आणि धर्मेंद्रचा सिनेमा लागला. तर आर्धे पैसे फिटले म्हणून ही नाचली होती. बाजूच्या खोलीत कुलकर्णी भाऊबहिणी गुण्यागोविंदाने राहायचे. त्यांच्या खोलीत लिहिलेले एक वाक्य अजूनही मला आठवतंय आणि कायम लक्षात ठेवेन. ते म्हणजे ‘द्राक्षाचा घड घेतला की त्यातली काही द्राक्षे गोड असतात, काही आंबट. तसाच मनुष्य स्वभाव आहे. काही चांगले काही वाईट. तसेच आपण मित्र म्हणून कुणाला स्वीकारले की वाईट गोष्टी सोडून द्यायच्या असतात.’

बघा ना, शेजारी या शब्दाभोवती किती आठवणी गुंफल्या आहेत ते. पांडूच्या आईच्या हातची चकली, नित्याच्या आईची चण्याची उसळ आणि दिवाळीतील करंज्या. मामी (तानंगकर) पोळीचे बिस्किट करायची. मालगावे श्रीखंड, बासुंदी, कुलकर्णी आजींची काफी बरं (कॉफी नाही, काफी हा), जोशींच्या बरोबर एका गावाला (बहुधा बांबवडे) गेलो होतो, तिथे मनसोक्त पाण्यात डुंबलो. खूप खूप आठवणी आहेत. नदीवर पोहायला शिकणे, चिंचा, पेरू खाणे, एकत्र टीव्ही बघणे, रात्री-अपरात्री पाणी भरण्यासाठी एकमेकांना उठवणे, कितीतरी आठवणी या निमित्ताने ताज्या झाल्या. आता आम्ही सारखे भेटू शकत नाही, पण आम्ही ग्रुप केलाय बरं का परत. त्यामुळे बकुळीसारखा त्याचा सुवास दरवळत आहे, त्या नात्याचा.

बकुळीसारखं आमचं नातं, सुकलं तरी दरवळत राही, आठवणींचं मोरपीस जसं, पानाआडून डोकावत राही.

---

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक ३२**

# एका ट्रिपची गोष्ट

**- सौ. गार्गी भिडे, पनवेल**
**८४५२०४०९३२**

तसे तर कुठे पण भटकायला आम्हा सात जणींना आवडायचेच म्हणा. पण आमचे भटकणे म्हणजे सांगलीतल्या सांगलीत. म्हणजे कॉलेजमधून घरी चालत येणे किंवा अभयनगरमधून ते रेल्वे रूळ ओलांडून तात्यासाहेबांच्या मळ्यातून आमच्या सोसायटीत जाणे. एकदा मोराचा आवाज ऐकून त्याला शोधण्यासाठी मी आणि बन्सी पळत गेल्याचे पण आठवत आहे. या पलीकडे काही कधी कुठे गेलो नव्हतो. पण टी.वाय.ला होतो आणि आम्ही ठरवले, कुठे तरी जायचे आपण ट्रिपला. एवढे मात्र नक्की होते की सकाळी जाऊन संध्याकाळी परत येणे गरजेचेच आहे. असे ठिकाण म्हणजे अर्थातच गोकाकचा धबधबा. अहाहा ! हे ठिकाण ठरले, घरून परवानगी घेतली आणि मग पुढची तयारी म्हणजे माहिती मिळवणे चालू केले. आमचा सात जणींचा ग्रुप होता पण दोघी नाही आल्या. मग आम्ही पाच आणि दोघींच्या छोट्या बहिणी अशा सात जणींनी जायचे ठरले. मिरजेतून सकाळी सहाला ट्रेन होती म्हणून आम्ही रात्री निवेदिताकडे राहिलो आणि धम्माल केली. अशी धम्माल परत कधी केली नसेल. तेव्हा कधी जागेचा प्रश्न पडत नव्हता. निवीच्या घरी आम्ही बिनधास्त राहिलो. तिच्या आई-बाबांनी आमची भारी बडदास्त ठेवली होती. रात्री धाडस करून आम्ही प्लॅन्चेट पण केले. खूपजणांना बोलावून खूप प्रश्न विचारले आणि उत्तर बघून मजा केली. मग लवकर उठायचे असल्याने झोपावे लागले. सकाळी ट्रेनने निघून गोकाकला उतरलो आणि रिक्षेने धबधब्याच्या इथे पोहोचलो. तेथून एक झुलता पूल ओलांडून पलीकडे गेलो. नयनरम्य धबधबा दिसायला सुरुवात झाली. किती सांगू मी सांगू कुणाला, आज आनंदी आनंद झाला, असे झाले बघा. तिथे थोड्या थोड्या पाण्यात सगळे खेळत होते. थोडासाच पाऊस सुखद गारवा देत होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथे पाण्यात खूपच शिवपिंडी तयार झाल्या आहेत. क्षणभर ज्ञानेश्वरकालीन विसोबा खेचर यांची आठवण झाली. जिथून पाणी खाली पडत होते तिथे आमच्यातल्या दोघी शूरवीर मैत्रिणी जाऊन बसल्या. आम्ही मात्र थोडे मागे होतो. शाळेत असताना पण इथे ट्रीप गेली होती पण झुलत्या पुलावरून चालताना भिऊन मी मागे परत येऊन बसमध्ये जाऊन बसले होते आणि शिक्षकांना घाबरवून सोडले होते. ते मला तिथेच शोधत बसले होते आणि मला बसमध्ये बघून निःश्वास टाकला होता याची आठवण झाली. असो. जिथून पाणी पडत होते तिथे खूप खेळलो. नंतर खाली जिथे पाणी पडते तिथे पण गेलो. गर्दी खूप होती त्यामुळे भीती कमी, पण खाली जाताना जो रस्ता आहे, पायऱ्या आहेत त्यावरून जपून जावे लागत होते. पण मजा होती त्यात. तिथे एक मोठा कठडा होता. त्यावरून या सगळ्या पटापट पलीकडे डुंबायला गेल्याआणि मी मात्र घाबरत होते, खाली पडले तर काय म्हणून. त्यांनी खूप बोलावले पण मी घाबरत होते. शेवटी हिय्या करून कठड्यावरून खाली उतरले आणि पळत त्यांच्यात सामील झाले. आज विचार करताना भीती वाटते की जर खाली चिखल गाळ असता तर केवढ्याला पडले असते सगळे. आज इतकी वर्षे झाली या ट्रिपला पण अजूनही सगळे आठवणीत आहे. आणि हो, या पूर्ण दिवसात थोडे फार जे नेले होते ते खाल्ले पण त्या दिवशी खाणे हे कदाचित थोडे गौण होते आमच्यासाठी. असंच असते ना ? परत येताना वेळेत गाडी पकडायची म्हणून निघालो, भरपूर फोटो काढले. गाडी आणि त्यात बसायला जागा मिळाली. सहज एक गंमत

आठवली. आम्ही परत येताना गाडीत एक मोठ्या आवाजात गाणारा मुलगा आला होता, त्याला पैसे देऊन आम्ही पिटाळले, तर काही आगाऊ मुलांनी त्याला असेच गाण्यासाठी पैसे दिले आणि हसू लागले. अर्थात ती मुले थोडी गंमत करत होती एवढेच. पण तेव्हा प्रचंड राग आला होता त्यांचा. अगदी पाचच मिनिटात, त्याला गाणी बंद करायला सांगितली. नंतर गाडीच्या डब्यात बघितले तर आमच्या एका मैत्रिणीचे काका त्याच डब्यात होते. त्याचे आमच्या घरी येणे-जाणे होते. फारसे काही चेष्टामस्करी नव्हती झाली पण तेव्हा मुली अशा गोष्टींना घाबरायच्या ना ? आता सगळीच गंमत वाटते पण. ही ट्रीप खूप आनंदाचा ठेवा देऊन गेलीय, आम्हा सर्वांनाच. जाऊया का आपण पण पावसाळी सहलीला, इकडेच ?

---

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक ३३**

# शाळा कॉलेजातील आठवणी

**- सौ. गार्गी भिडे, पनवेल**
**८४५२०४०९३२**

थंडीच्या दिवसात सकाळी लवकर उठून क्लासला जाणे हे मस्त वाटायचे. पहाटे उठून, आई-बाबांना आणि दादालाही न उठवता, आपलं आपलं आवरून क्लासला जाणे ही मजा वाटायची. बारावी असल्यामुळे चांगले मार्क्स मिळवून पास होणे हे पण उद्दिष्ट होते आणि त्यातून नवीन नवीन सायकल चालवत जाणे हे तर खूप मस्त. त्यातून नवरात्र चालू होते, त्यामुळे जास्त प्रसन्न वाटत होते. रोज अभया, आमच्या घरापाशी यायची आणि मग आम्ही दोघी शिंदे सरांकडे शिकवणीला जायचो. सर खूप मस्त शिकवायचे. सकाळी सहाचा क्लास. अहाहा ! १३ ऑक्टोबर १९८८ हा तो दिवस. अभया त्या दिवशी लुना घेऊन आली होती आणि मी सायकलवर. तिच्याशी बोलत बोलत कधी क्लासला पोहोचलो कळायचे पण नाही. त्या दिवशी पण आम्ही त्या नवीन केलेल्या रस्त्याने जाता जाता किती छान रस्ते आहेत त्याबद्दल बोलत होतो. नंतर क्लासपाशी आलो, अभयाने उजवीकडे हात दाखवला आणि आता क्लास समोर सायकल लावायची बाकी होते. मी सायकल वळवली आणि ...

आणि काय ते मला काहीही आठवत नाही. हो, कारण त्याचवेळी समोरून कायनॅटिकवरून येणाऱ्या एकाशी धडक झाली आणि मी खाली पडले. क्लासची मुले-मुली तिथे उभी होती. मी उठायची वाट बघितली असावी त्यांनी एक-दोन मिनिटे आणि नंतर लगेच बाजूच्या दवाखान्यात प्रथमोपचार करण्यासाठी नेले. साबळे डॉक्टर. तिथे मी पाणी प्यायले असे मला सांगितले नंतर. पण मुकामार जास्त असल्याने ॲडमिट करणे जरुरी होते. अर्थात मला नंतर समजले, आता काहीही आठवत नाहीच. वर्गातल्या मुलांशी बोलत नसलो तरी ओळख होतीच. तर बहुधा नंदकुमार पवार आषि पेडणेकर (की पेंडुरकर) असे दोघे आमच्या घरी गेले आणि ‘आशाला थोडे लागले आहे’ असे सांगितले. त्या दोघांचे आभार पण नाही मानले. मुलांशी बोलत नव्हते ना ! मला घेऊन हॉस्पिटलची शोधाशोध सुरू झाली. ॲक्सिडेंटची केस होती म्हणून जरा अवघड जात होते. पण अपरा नाटेकरने डॉक्टरांना सांगितले आणि मी पुरोहित हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. एवढे सगळे लक्षात असणाऱ्या मला मी क्लासला निघाले आणि अभयाशी बोलत होते, या पुढचे काहीही आठवत नाही. आठवतंय, ते दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्या मावशीने प्रेमाने आणलेले टोमॅटो सूप. पायही हलवता न येणारी मी मावशीला सूप नको, काही नको, मी फेकून देईन असे ओरडणारी मी. असो, ते दवाखान्यातले दोन दिवस आठवले की कितीतरी भावना दाटून येतात. वर्गातली बरीचशी मुले-मुली बघायला येत होती. मला आता नावे पण आठवत नाहीत. सर पण येऊन गेले दवाखान्यात. शुभदाची आई पण आली होती. माझी मावशी, जिने मला लहानपणी सांभाळले होते तिला मला थोडा जरी त्रास झाला तरी लगेच कळायचे. अगदी ‘या हृदयीचे ते हृदयी’ असे असायचे. ती पण येऊन गेली. एकूण काय आशा पटवर्धन एकदम फेमस होऊन गेली ना ! पूर्ण डाव्या बाजूला मार लागला होता, चालता येत नव्हते. व्हील चेअरवरून दोन दिवस थोडे फिरवले, ते पण नको वाटत होते. कोणी भेटायला आले तर तेवढेच बरे वाटायचे. पण तशी गुंगीतच होते. गंमत म्हणजे (आता गंमत वाटतेय) धडक झाली तो पण पटवर्धनच होता. हॉस्पिटलमध्ये एकदा व्हिल चेअरवरून थोडे फिरवल्याचे आठवत आहे. आई-बाबा नक्कीच काळजीत असणार. कारण मला एक पाऊलही टाकता येत नव्हते. दोन-तीन दिवसांनी घरी सोडले आणि आम्ही घराच्या खाली आलो. आता आम्ही तर तिसऱ्या मजल्यावर राहात होतो, वर कसं न्यायचे हा विचार चालू होता. मला लाकडी खुर्चीवरून वर न्यायचे ठरले. मला तर काही कळत नव्हते. भीती वाटत होती. चार जणांनी खुर्ची धरली. माझा भाऊ अगदी अशक्त, पण तो पण पुढे आला. त्यावेळी फोन वगैरे फारसे नव्हते त्यामुळे कुणाला कळवणे अवघड होते. एवढ्यात समोरून राजूदादा येताना दिसला. हा आणि कुटुंबाला माझी प्रत्येक गोष्ट कळतेच कळते. मग वर घरी नेले आणि मी निःश्वास टाकला. सकाळी उठले तर आई-बाबा चहा पित होते. बोलताना अर्थात माझाच विषय असणार. उठले आणि कुठून बळ आले कोणास ठाऊक, लंगडत लंगडत मी दोन पावले गेले. त्या क्षणी आई-बाबांच्या चेहऱ्यावर जो आनंद बघितलाय तो आजपर्यंत मी विसरू शकले नाही. लवकरच मी नीट चालू लागले. यथावकाश क्लास आणि कॉलेजला गेले. फेमस झाले होते म्हणा, कारण एकदा कॉम्प्युटरच्या पिरियडला बरोबर उत्तर दिले तर कुलकर्णी सर म्हणालेच, बघा, बघा, किती दिवसांनंतर या कॉलेजला आल्यात, तरी बरोबर उत्तर देत आहेत. बघा जरा’. असो, या काळात खूप जणांनी आम्ही सर्वांना खूप सहकार्य केले. नेहमीप्रमाणे वाड्यातील सगळे पाठीशी होतेच. मी खूप नशिबवान आहे, अशी माणसे मला आयुष्यात लाभली. परमेश्वराचे खूप खूप आभार यासाठी !

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक ३५

# नंदनवन काश्मीर - असेही !

- श्रीमती दिपाली दिलीप भिडे,
पुणे. ९९२३७४८६४०



सहल किंवा ट्रीप. हा शब्द नुसता उच्चारला तरी सगळ्यांच्या अंगात चैतन्य सळसळते. अगदी ती छोटीशी शहरातल्या बागेतली का असेना सर्व आनंदाने आणि उत्साहाने भारावतात. त्यात काश्मीरची ट्रीप म्हटल्यावर तर स्वर्ग अगदी दोन बोटेच उरतो. प्रत्येकाच्या जीवनातले जणू हे स्वप्नच असते की आपण काश्मीरला जायचेच. भूतलावरचा स्वर्ग ! रमणीय निसर्ग वेड लावणारा आणि परत परत तिथे बोलावणारा. माझ्याही आयुष्यात तो सुंदर क्षण अवतरला. २५ एप्रिल २०१४ ला मी सर्व तयारीनिशी पुणे स्टेशनवर झेलम एक्सप्रेसने जायला निघाले. आमची ट्रीप आमच्या ओळखीचे (गेली १५-२० वर्षे भारतभर सुंदर ट्रिप्स काढणारे त्रिमूर्ती ट्रॅव्हल्स) श्री. फोंडगे, आंब्रे, पवार यांच्याकडे आधीच बुक केल्याने अजिबात टेंशन नव्हते. फक्त एन्जॉय आणि एन्जॉय इतकेच काम होते. प्रवासात सगळ्यांच्या गाण्याच्या भेंड्या, जोक्स वगैरे धमाल सुरू झाली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही जम्मूला पोहोचलो आणि आमची सहल खऱ्या अर्थाने सुरू झाली. पाच छोट्या टुरिस्टर ट्रॅव्हलर्स आमची वाट बघत होत्या. रात्रीचे जेवण करून श्रीनगरला लगेच निघावे असे ठरले. पण आमचे ड्रायव्हर्स अजिबात तयार होत नव्हते. त्यांचा आग्रह असा की रात्रीचा प्रवास करणे फारच धोक्याचे आहे. सकाळी निघावे. काश्मीरची परिस्थिती त्यावेळी खूप खराबच होती. त्यांना खूप समजावून पूर्ण आमच्या जबाबदारीवर निघायचे ठरले. मला रात्री झोप येत नाही ह्या सवयीचा इथे फायदा झाला. रात्री ड्रायव्हरला गाडी चालवताना झोप येऊ नये म्हणून त्याच्या शेजारी पहिल्या सिटवर बसण्याची जबाबदारी झोप न येणाऱ्या माझ्यावर आली. शेवटी १-१॥ तास घासाघीस केल्यावर आमच्या गाड्या पुढे निघाल्या. सर्व ड्रायव्हर्स तरुणच होते. आमचा ड्रायव्हर तर खूपच तरुण होता. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. त्याचे नाव प्रितम. जवळजवळ अर्धे अंतर गेल्यावर घाटात इकडून जाणारा सर्व ट्रॅफिक जाम होता. दुसरीकडची वाहने थोडी थोडी सोडत होते. रांग तर इतकी मोठी होती की एक पूर्ण दिवस गेला असता. बाकीचे चार ड्रायव्हर्स तयार नव्हते पण ह्या प्रितमने थोडा विचार करून सर्व गाड्यांना ओव्हरटेक करून गाडी खूप पुढे आणली. साधारणपणे एक तासाने चेकपोस्ट वर गेल्यावर पोलिसांनी काय नाव, कुठून आलात वगैरे चौकशी करण्यास सुरुवात केली तोच मुळी निर्घृणपणे दंडुक्याने त्याला मारत. मला हे सर्व नवीन होते पण तो म्हणाला हे रोजचेच आहे. साधे बोलतच नाहीत. पोलिसांनी त्याला खूप मारले काहीही कारण नसताना. पण माझ्या अंगावर काटा आला आणि त्यांच्या जीवनाची जाणीव झाली. तिथल्या परिस्थितीची कल्पना आली. तिथले लोक बोलण्याची सुरुवात 'आप हिंदुस्थानसे आए हो क्या ? कैसा लगा हमारा काश्मीर ?' अशीच करतात. ह्याचा अनुभव मी १९८४ सालीही घेतला होता. पण असेच अजून २-३ प्रसंग आमच्यासमोर यायचे होते.

शेवटी सकाळी ९ वाजता आम्ही श्रीनगरला पोहोचलो. सर्व आवरून थोडा आराम करून संध्याकाळी डललेकला फेरफटका मारून आलो. बोटिंगचा कार्यक्रम येतानाच्या मुक्कामात होता. दुसऱ्या दिवसापासून रोज सकाळी उठून एक दिवस पहेलगाम, सोनमर्ग, गुलमर्ग वगैरे स्थलदर्शन खूप छान झाले तेही सर्व टेन्शन घेतच. पण त्या प्रत्येक स्थळी गेल्यावर तिथले निसर्गसौंदर्य, रमणीयता पाहून सर्व टेन्शन्स विसरली जात होती. रोज आज इथे बंद आहे, तिथे कुठे टुरिस्ट गाडीवर दगडफेक झाली, कुठे दंगल झाली अशा एकेक बातम्या कानावर येत होत्याच. वाटेत आधेमधे गाड्या अडवणे, चेकिंग सुरू होतेच. गोळीबारही होत होता. पण आमचे टूर ऑर्गनायझरर्स सर्व सांभाळून घेत होते. शेवटी ट्रिपचा शेवटचा टप्पा सुरू झाला. खरेतर तिथे सगळे धोकादायक असूनही तिथून परत येऊच नये असे वाटत होते. ट्रिप संपू नये ... पण इलाज नव्हता. त्या दिवशी सगळ्यांनी अगदी भरपूर खरेदी केली. ड्रेस मटेरियल, शॉल्स, शोभेच्या वस्तू, संध्याकाळी डल लेकचा बोटीने मस्त फेरफटका करून मन प्रसन्न झाले. सकाळी जम्मू आणि वैष्णोदेवीसाठी निघायचे होते. तोच बातमी आली सगळीकडे दंगल झालीये, रस्ते बंद आहेत. आता जाता येणार नाही. त्या हॉटेलचे बुकिंग तर संपले होते आणि राहिलो तर पुढचेही वाया जाणार होते. सर्वांना काहीच सुचत नव्हते. एक विचार असाही झाला की वैष्णोदेवीचा प्रोग्रॅम कॅन्सल करून डायरेक्ट जम्मू स्टेशनला जावे. परवाची परतीची गाडीही होती ना ! पण जाणार कसे ? हे करू, ते करू करता करता पार अगदी आर्मी इन्चार्जना फोन करायचाही विचार झाला. पण त्यांच्याही हातात काही नव्हते. शेवटी पहाटे चार वाजता पटकन सर्व आवरून आम्ही निघालो. वाटेत बनीहाल पास पाशी रस्ता बंद. गाड्या थांबलेल्या. खूप वेळ वाट बघितली पण गेट उघडण्याची चिन्हे दिसेनात. आयोजकांनी बरोबर घातलेले चहा, ढोकळ्याचा ब्रेकफास्ट झाला आणि त्यांनी सगळीकडे चौकशी सुरू केली. तिथे जवळ एक गव्हर्मेंटचे गेस्ट हाऊस होते. तिथे विनंती करून त्यांनी गाद्या, पांघरुणाची सोय करून आराम करण्यास सांगितले. कारण तिथून केव्हा सुटका होईल काहीच सांगता येत नव्हते. कुणी गप्पा मारत होते, कुणी तिथेच बागेत बॉल खेळत होते. आमच्यासारखे तिथे खूप लोक थांबलेले होते. शेवटी ह्याची ओळख, त्याची ओळख करून पार मंत्री महोदयांना दिल्लीला फोन लावले गेले. त्यांच्याशी आम्ही लेडिज स्वतः बोललो की बायका-मुले आहेत तरी सोडायची काहीतरी व्यवस्था करावी कारण असे सांगण्यात आले होते की किती दिवस लागतील ते सांगता येत नाही. तिथेच दुपारचे जेवण बनवून सर्वांचे जेवण झाले. सर्व बसले असताना एकदम गडबड उडाली की गेट उघडले. असतील तसे सर्व सामानासहित गाडीत बसलो. आमच्या गाड्या ह्या गेटमधून पुलाच्या पलीकडे गेल्या. झाले ...

पुढे गेल्यावर पोलिसांनी अडवले की कुणाच्या परवानगीने विचारून पुढे आलात ? गाड्या बाजूला घेतल्या. पोलिसांनी ड्रायव्हर्सना लगेच मारायला सुरुवात केली. आम्ही सांगितले की त्या गेटमधून सोडले म्हणून आलो. पण त्यांनी काही ऐकून, समजून घ्यायचेच नव्हते. कुणाकुणाची आय.डी कार्डस् ठेवून घेतली. इथेही आम्ही लेडिज त्यांच्याशी सारखे बोलून विनंती करत होतो. पण ते ड्रायव्हर्स खेरीज कुणाशी बोलत नव्हते. शेवटी दोन तास असा त्रास दिल्यावर देवीच्या कृपेने व आमच्या नशिबाने आम्हाला जायची परवानगी मिळाली. हुश्श... आम्ही कटऱ्याला पोहोचलो. शांतपणे देवीचे दर्शन घेऊन, आम्ही सुखरूप असल्याचे तिचे आभार मानून दुसऱ्या दिवशी जम्मू स्टेशनला आलो आणि जीव भांड्यात पडला. आमचे ऑर्गनायझर्स खूप प्रसंगावधानी आणि पटकन निर्णय घेणारे असल्याने आमची ट्रिप चांगली झाली. आम्ही त्यांना प्रेमाने 'त्रिमूर्ती' म्हणतो. त्यांचे शतशः आभार ! अशी आमची पृथ्वीच्या स्वर्गाची रमणीय पण तितकीच दाहक आणि टेन्शनच्या वातावरणातली सहल संपली. पण कायम लक्षात राहिली.

---

# निरोप

- सौ. अनघा (भिडे) सातर्डेकर, पुणे
९००४०७८४३३

२०२२ च्या उंबरठ्यावर उभे असलेले आपण अवघ्या १ दिवसात २०२१ ला निरोप देणशर आहोत. सरते वर्ष आपल्या सगळ्यांवर (मनुष्यजातीवर) 'न भूतो न भविष्यती' असे कोरोना संकट घेऊन आले आणि अनेकांची आयुष्ये बदलून गेली. कुणाचे संसार उघड्यावर पडले, कुणाच्या नोकऱ्या गेल्या, कुणी डिप्रेशनमध्ये गेले तर कुणी आयुष्ये संपवली. एकुणच हे वर्ष अनेक संकटांची मालिका घेऊन आले आणि आपण सगळेच फक्त 'नियतीने मांडलेल्या या रडीच्या डावात उलटी पडलेली 'दानं' हताशपणे बघत बसलो. आपल्या हातात काहीच नसते हे जाणवून अगतिक होऊन आपण फक्त त्रयस्थासारखे पाहात राहिलो. येणारे नवीन वर्ष नवी उमेद, नव्या आकांक्षा घेऊन येईल, कोरोनावर लस तर मिळालीय पण ती लवकर येऊन उपाय सापडेल आणि आपले आयुष्य पूर्ववत होईल या एका आशेवर दिवस घालवणारे आपण २०२१ ला निरोप द्यायला नेहमीपेक्षा जास्तच उतावीळ आहोत, नाही का ?

निरोप, सेंड ऑफ, गुड बाय - सगळ्यांचा अर्थ एकच - आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यावर प्रत्येकाला कधी ना कधी निरोप द्यायची वेळ येतेच येते. 'निरोप' मगतो माणसांचा असो, नात्यांचा असो, जुन्या परंपरांचा, रूढींचा, प्रस्थापित मतांचा, विचारांचा, स्थळ काळाचा असो किंवा अगदी आयुष्याचा - कधी निरोप द्यावा सुद्धा लागतो काही गहिऱ्या क्षणांना, काही हळव्या आठवणींना, कधी हव्याशा ऋतूंना, ओठावर फुललेल्या स्मितहास्याला, क्वचित काही स्वप्नांना, कधी एखाद्या जिवलगाला तरी कधी ओघळणाऱ्या आसवांना. ही निरोपाची वेळ मात्र अस्थिर, कातर करणारी असते. नव्याचे स्वागत करण्याची ओढ आणि जीर्ण झालेले जुनेरं टाकून द्यायची अनिवार्यता यामध्ये जी काही स्थित्यंतरे घडतात त म्हणजे 'आयुष्य'. बालपणाची सुटणारी संगत निरोप घेते न घेते तोवर पौगंडावस्था दारावर येऊन ठेपते अगदी आपल्याही नकळत. शाळेचा निरोप घेताना मित्रमैत्रिणी सुटतात, शाळेचे ग्राऊंड, मधली सुट्टी, उन्हाळी सुट्टी सगळे संपते, सुरवंटाचे फुलपाखरू होतानाचे अनघड आणि अवघड दिवस भुर्रकन उडून जातात मात्र एकीकडे कॉलेजचे फुलपंखी दिवस खुणावत असतात. कॉलेजमध्ये खऱ्या अर्थाने फुलत बहरत असताना अवखळ तारुण्याची चाहूल लागते आणि उत्साहाची सळसळ अनुभवून कॉलेजचा निरोप घेताना पुढे साकारणाऱ्या भविष्याची नांदी खुणावत असते.

करियरची योग्य निवड करताना आणि पुढे दिसणाऱ्या पाऊलवाटेला हमरस्ता करताना अनेक निरोप घ्यावे लागतात. कधी थोड्या काळापुरता घरच्यांचा निरोप घ्यावा लागतो तर कधी शहर, प्रांत, देशाचे सीमोल्लंघन करताना जड अंतःकरणाने निरोप घ्यावा लागतो. आपले वाटणारे सगळे सगळे सोडून जाताना दुसऱ्याचे आपलेसे करायची वेळ निरोपाची सावली अधिकच गडद करत जाते. मग एक वेळ अशी येते की मुलींना आपल्या घराचा, माहेरचा निरोप घेऊन सासरच्या घरचा उंबरठा ओलांडावा लागतो. एका स्त्रीला आयुष्यातला सगळ्यात मोठा निरोप - आपल्या जन्मदात्यांचा - ज्यांनी तिला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेले असते, तिला फुलाप्रमाणे सांभाळलेले असते, त्यांचा निरोप घेताना पाय किती जड होत असतील तिचे ? नवा संसार फुलवण्यासाठी घेतलेला हा निरोप अनेक आशीर्वादांच्या पायघड्या घालून देतो आणि तिचा प्रवास सुखाचा होतो (!?)

कधी नोकरीधंद्यासाठी दोघांनाही आपापल्या कुटुंबांचा निरोप घ्यावा लागतो, काही काळापुरता, गावा-शहरापल्याड तर कधी देशापल्याड. या टप्प्यापर्यंत घेतलेले अनेक निरोप समजून उमजून, प्रत्येक पावलावर, नव्या वाटेवर नव्या प्रवासासाठी घेतलेले असतात. या प्रवासात भेटलेले अनेक मित्रमैत्रिणी, सहकारी, जवळच्या परिघातले, दूरच्या नात्यातले असे अनेक सोयरे सकळ कधी ना कधी आपला निरोप घेत राहतात. कधी दुःखद, कधी सुखद, कधी दाहक, कधी प्रेरक असे हे निरोप घेणे अपरिहार्य ठरत जाते. आयुष्यातले भले बुरे दिवस

जगताना, अनुभवांची गाठोडी सोबत घेऊन एका वळणावर अनपेक्षितपणे निवृत्तीची चाहूल लागते. गेली ३५-४० वर्षे अव्याहत सुरू असलेली गाडी अचानक ब्रेक लागून थांबते आणि नोकरी-धंदा-व्यवसायाचा निरोप घ्यायची वेळ आपल्याही नकळत दारात येऊन ठेपते. या प्रवासातले सखेसोबती, रोजच्या प्रवासाच्या गाड्या, रोजची ये-जा करताना अनेक वर्षे जुळलेले ऋणानुबंध, नोकऱ्या, व्यवसाय बदलताना होणारी अशक्य दमछाक, स्थित्यंतरे या सगळ्या सगळ्यातून बाहेर पडताना घ्यावा लागणारा 'निरोप' जणू काही आयुष्यच थांबून गेलेय ही पोटात खड्डा पाडणारी जाणीव मन पोखरून टाकते. हा निरोप खऱ्या अर्थाने कठीण असतो, मन विषण्ण करणारा एक उदास पोकळी, रिकामपण घेऊन येणारा पण त्यावर कोणाचाच इलाज नसतो. हे कालचक्र असेच अव्याहत सुरू राहते. मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीचे आणि मग अजून पुढच्या पिढीकडे - आणि एक दिवस अवचित वेळ येते शेवटचा निरोप घेण्याची ... दोघांपैकी एक जण निरोप घेऊन पुढे जातो, पुढचा मुक्काम गाठण्यासाठी आणि मागे राहणारा वाट बघत राहतो आपल्या परतीच्या प्रवासाचे तिकीट मिळून मागे राहिलेल्यांचा निरोप घेण्याची -

'संधिप्रकाशात अजून जो सोने। तो माझी लोचने मिटो यावी॥
वाळल्या ओठा दे निरोपाचे फूल। भूलीतली भूल शेवटली॥


# अभिनंदन !

सौ. नुपुरा गाडगीळ-भिडे, पुणे ह्यांनी स्पेन येथे नुकत्याच झालेल्या वुमन्स डबलमध्ये **ElPozo BWF World Senior** बॅडमिंटन २०२१ ह्या स्पर्धेमध्ये मास्टर्स टुर्नामेंटसाठी भारताकडून रौप्य पदक पटकावले. सौ. नुपुरा ह्या इंदोरचे महालक्ष्मी वस्त्र भांडारचे श्री. अभिषेक भिडे यांच्या भगिनी आहेत. त्या ११ वर्षांच्या असतानाच १५ वयोगटात खेळून त्यांनी स्पर्धा जिंकली. इंदोरमध्ये बी.कॉम. ही पदवी संपादन केली. पुढे निखिल गाडगीळ यांच्याशी विवाह झाल्यानंतर संसाराची जबाबदारी व लहान मुले ह्यामुळे खेळामध्ये खंड पडला. परंतु मुळातच ऊर्मी व आवड असल्यामुळे पुन्हा स्पर्धेमध्ये सहभागी झाल्या. वयोगट ३५ अधिक वुमन्स डबल आणि मिक्स डबल खेळायला सुरुवात केली. २०१७-२०१८ मध्ये राष्ट्रीय विजेता झाल्या, २०१९ मध्ये पोलंड येथे सहभागी झाल्या आणि स्पेनला २०२१ मध्ये नुकत्याच झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारताकडून रौप्य पदक मिळविले ही भिडे कुटुंबियांच्या दृष्टीने विशेष अभिमानाची बाब आहे. त्या सध्या **VKBA, Pune** येथे बॅडमिंटन अॅकॅडमीमध्ये कोचिंग देतात. सौ. नुपुरा ह्यांना पुढील यशासाठी हार्दिक शुभेच्छा आणि ही यशाची पताका अशीच विश्वात झळकूदे ही सदिच्छा !



*****

हिंदुस्थान कॉपर लिमिटेड **(HCL)** ह्या भारत सरकारच्या संस्थेमध्ये नॉन ऑफिशियल डायरेक्टर म्हणून ३ वर्षांकरिता भारत सरकारकडून नाशिकचे सुप्रसिद्ध व निष्णात वकील, कायदेतज्ज्ञ अॅड. श्री. अविनाश जनार्दन भिडे ह्यांची नोव्हेंबर २०२१ मध्ये मा. राष्टपती यांचे संमतीने भारत सरकारकडून नियुक्ती करण्यात आली. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान व समस्त भिडे कुटुंबियांतर्फे वकील साहेबांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा ! नाशिकमध्ये ५ वर्षांपूर्वी भिडे संमेलनाच्या आयोजनात त्यांचा सिंहाचा वाटा होता. पुन्हा एकदा त्यांचे हार्दिक अभिनंदन !



*****

पर्यावरण, आरोग्य आणि राष्ट्रभक्ती या विषयांस समर्पित, कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित चौथ्या राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलनाचे औचित्य साधून गोसेवा, जीवदया पर्यावरण रक्षणासाठी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून संगमनेरचे धडाडीचे व तरुण पत्रकार श्री. विवेक भालचंद्र भिडे यांना पुणे येथे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याकरिता भिडे प्रतिष्ठान व समस्त कुटुंबियांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !



भारतीय संस्कृतीमध्ये गोहत्या व गोमांस सेवन निषिद्ध आहे. पण ज्या काही प्रवृत्ती आर्थिक लोभापोटी ह्याचा व्यवसाय करतात. गोमातेचे रक्षणासाठी श्री. विवेक भिडे यांनी १५ वर्षांच्या पत्रकारितेत बेकायदा कत्तलखान्यात घुसून, जिवाला न घाबरता, गोवंश हत्या किती निर्दयपणे होते हे आपल्या कॅमेऱ्यात टिपून यावर निर्भिडपणे, बेधडकपणे लिखाण केले, वन्य जीव वाचले पाहिजेत ह्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान केला. ह्याशिवाय नगर जिल्ह्यात कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचे योगदान आहे. त्यायोगे त्यांना चौथ्या राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती संमेलनात हा सन्मान देण्यात आला. ह्या तरुण पत्रकारितेला भिडे परिवाराकडून मानाचा मुजरा !

# डोंबिवली-कराड-डोंबिवली : एक वेगवान प्रवास

- कौस्तुभ भिडे, डोंबिवली.
मो. ९८६९१७६९९३

२४ डिसेंबरला निलेशने मला फोन केला अन् सहज विचारलं की एका दिवसात कराडला जाऊन रिटर्न येऊ शकतो का ? गाड्या कुठल्या मिळतील वगैरे वगैरे... तसे बघितले तर निलेश पनवेलला राहात असल्याने त्याला गाड्यांची काहीच कमी नव्हती. त्यामुळे पाच-दहा मिनिटातच प्लॅन तयार झाला. शनिवारी २६-१२-२०२० ला निलेश कराड रिटर्न ट्रीप करणार होता. आता आपला मित्र चाललाय म्हटल्यावर साहजिकच मलाही इच्छा झालीच. मग आम्ही दोघांनी संगनमताने २७-१२-२०२०, रविवारचा प्लॅन पक्का केला. या प्रवासासाठी मी खूपच एक्साईटेड होतो. कारण एका दिवसात डोंबिवली-कराड-डोंबिवली हे एक आव्हान होते. आव्हान यासाठी की मला काहीही करून स्वारगेटला संध्याकाळी ६.३० ची स्वारगेट-कल्याण शिवशाही गाडी पकडायचीच होती. ही पुण्याहून डोंबिवलीला येणारी शेवटची गाडी आहे. यानंतर पुणे-डोंबिवली थेट गाडी नाही. म्हणजे मला त्या अगोदर स्वारगेटला येणे भाग होते. आता सकाळी ५.३० ला निघालेली गाडी कराडला पोचायला कमीत कमी १.३० तरी वाजणार. त्यापुढे रिटर्न स्वारगेट प्रवास सुद्धा कमीतकमी ४ तासांचा म्हणजे मी दुपारी १.३० ला कराडहून गाडी पकडली तरी मला स्वारगेटला यायला संध्याकाळचे ५.३०-६ होणार. असे सगळे एकदम कट यू कट प्लॅनिंग केले होते. जरा कुठे लेट झाला असता की मी बाराच्या भावात गेलो असतो. त्यात मी आईला छाती ठोकून सांगितले होते की स्वारगेटला रिटर्न येण्यात आणि माझी शिवशाही सुटण्यात १ तासाचे मार्जिन आहे. गाडी चुकणे शक्यच नाही. आणि जर गाडी चुकली असती तर... फारसे काही झाले नसते. कुठल्या ना कुठल्या मार्गाने घरी आलोच असतो अन् निमूटपणे आईच्या शिव्या खाऊन झोपलो असतो.

२७ तारखेचा दिवस उजाडला. माझी गाडी पहाटे ५.३० च्या आसपास डोंबिवली बस स्थानकात येणार होती अन् मी तिथे ५ वाजल्यापासून हजर होतो. साधारण ५.१५ च्या आसपास मुरुड आगाराची कल्याण-मुरुड गाडी आली आणि त्या गाडीच्या चालकांना मी सहज विचारले की भिवंडी-विजापूर गाडी कल्याणला दिसली का ? तसे विचारायची गरज नव्हती, पण आपले उगाच.. त्यांनी नकारार्थी मान हलवली. मी पण आपला मागे फिरलो आणि बरोबर ५.३० ला भिवंडी डेपोचे रॉकेट डोंबिवली स्थानकात घुसले आणि माझा प्रवास सुरू झाला. गाडीत गेल्या गेल्या लगेच रिझर्व्हेशन वगैरे चेकिंग झाल्यावर मी कंडक्टर साहेबांशी गप्पा मारायला सुरुवात केली. त्यांना आमच्या एस.टी. प्रेमींच्या ग्रुपविषयी अगोदरपासूनच माहिती असल्याने ओळख व्हायला फारसा वेळ लागला नाही. गप्पांच्या नादात आम्ही ६-६.१५ वाजता पनवेलला पोचलो ते समजलं सुद्धा नाही. डोंबिवली ते पनवेल हा प्रवास ३५-४० मिनिटात पण होऊ शकतो हे पहिल्यांदा समजले. पुढे पनवेल सोडून गाडी साधारण ६.४५ च्या आसपास एक्सप्रेस हायवेला लागली आणि सुरू झाला ओव्हरटेकचा खेळ. गाडी एकदम सुसाट पळत होती. घाटात मात्र थोडा वेग कमी झाला कारण मोठे ट्रक कंटेनर रस्त्याच्या तिन्ही लेन अडवून चालत होते. त्यामुळे थोडा वेग मंदावला. आमच्या ड्रायव्हर काकांनी संधी मिळताच त्यांना पण ओव्हरटेक करून गाडी परत पळवायला सुरुवात केली. बघता बघता आम्ही सकाळी ९ वाजता स्वारगेटला पोचलो. स्वारगेट म्हणजे आम्हा एस.टी.प्रेमींची पंढरीच जणू ! कोकण, सोलापूर, कोल्हापूर, पंढरपूर अशा अनेक भागात सुटणाऱ्या गाड्यांची नुसती गर्दी... आम्हालाच गाडी उभी करायला ५ मिनिटे वाट पाहावी लागली. स्वारगेटमधून निघाल्यावर कात्रज घाटमार्गे सातारा असा पुढचा प्रवास होता. कात्रज घाटातली एस.टी. ड्रायव्हिंग म्हणजे लाजवाबच ! पण त्यात माशी शिंकली. घाटात एक फोर व्हिलरवाला गाडी शिकत होता. शिकाऊ असल्याने साहजिकच तो पुढेही जात नव्हता अन् आम्हालाही जाऊ देत नव्हता. शेवटी कशीबशी त्याने साईड दिल्यावर आम्ही पुढे पास झालो. आता गाडी कोल्हापूर हायवेला लागली होती. पुढे कापूरहोळ, शिरवळ करत खंबाटकी घाट चढू लागली. घाटत एक भीषण अपघात झाला होता. त्यामुळे थोडे ट्रॅफिक झाले होते. त्यामुळे थोडा जास्त वेळ मोडला आणि घाट उतरून गाडी पुन्हा वेग पकडू लागली. पण या प्रवासात आमच्या गाडीच्या मागच्या चाकाची हवा कमी होत होती. शेवटी कशीबशी हळूहळू चालवत सावकाशपणे आम्ही दुपारी १२.३० च्या सुमारास साताऱ्यात पोचलो. गाडी थेट आगारात नेली. तिथे मेकॅनिकने चाकाची जुजबी तपासणी केली अन् सांगितले की बहुतेक पंक्चर असावे. चेक करायला १ तास लागेल. ते ऐकल्यावर तर माझी हवाच टाईट झाली. पण ज्या प्रवाशांना घाई होती अशा प्रवाशांना दुसऱ्या गाडीने पुढे जाण्याची सोय झाली आणि आम्ही बोरिवली-विटा या गाडीने सातारा ते कराड असा प्रवास केला. विटा डेपोची ती गाडी म्हणजे पळायला एक नंबर. हवेशी स्पर्धा. त्या गाडीने प्रवास खूपच मस्त झाला आणि आम्ही दुपारी २ च्या आसपास कराडला उतरलो. आधीच उशीर झाला असल्याने आजूबाजूला काहीही टाईमपास न करता जसे उतरलो तसे परतीची गाडी शोधायला लागलो आणि माझी लाडकी विजयदुर्ग-पुणे ही गाडी कराडमधून सुटतच होती. त्यामुळे तीच गाडी पकडली. आपल्या गावच्या गाडीची अनपेक्षित भेट झालेली पाहून एकदम भारी वाटले आणि थोडी नाराजीपण होती. कारण विजयदुर्ग-पुणे मार्ग जरी विजयदुर्ग चालवत असला तरी त्यावर गाडी मात्र ही कणकवली डेपोची होती. कारण विजयदुर्ग डेपोच्या गाड्या मुंबईमध्ये बेस्टच्या ड्युटीसाठी आल्या

होत्या. त्यामुळे कणकवलीवाल्यांनी विजयदुर्ग डेपोला गाडी वापरायला दिली होती. माझा परतीचा प्रवास चालू झाला. गावाची गाडी असल्याने कंडक्टर साहेबांशी सुद्धा ओळख झालीच होती. त्यामुळे त्यांच्याशी सुद्धा गप्पा रंगल्या. दुसरीकडे जिवाची घालमेल सुद्धा सुरू झाली कारण संध्याकाळी ६.३० च्या अगोदर स्वारगेटला पोचायचे होते. गाडी तशी पळायला एक नंबर होती, पण जुनी असल्याने पिकअप थोडा स्लो वाटला. चढणीला गाडी बऱ्यापैकी मार खात होती. पुढे कराड-उंब्रज-काशीळ-अतीत मार्गे गाडी दुपारी बरोबर ३.३० ला साताऱ्यात पोचली. तिथे पण जास्त वेळ न थांबता लगेच ५ मिनिटात सुटली. आता दुपारी ३.३० च्या आसपास साताऱ्यातून बाहेर पडलोय म्हटल्यावर खात्री वाटत होती की आपण संध्याकाळी ६.३० च्या अगोदर स्वारगेटला पोहचू. येताना सुद्धा थोडा थोडा ट्रॅफिक लागत होता अन् पुन्हा टेन्शन यायला चालू झाले. एव्हाना गाडी पुन्हा बेंगलोर हायवे सोडून कात्रज घाट चढत होती. इथून पुढेच खरा खेळ सुरू होणार होता. घाट संपून पुण्यात एन्ट्री केल्यावर ट्रॅफिक किती लागतो, सिग्नल कसे लागतात यावर माझे स्वारगेटला पोचणे निश्चित होणार होते. शेवटी ट्रॅफिक अन् सिग्नल आडवे आलेच. गाडी मुंगीच्या पावलांनी चालत होती. स्वारगेटला आपण वेळेत पोहचू की नाही ही शंका मनात यायला लागली होती. एव्हाना घरून फोनवर फोन येत होते. स्वारगेटला पोचलास का ? अजून किती वेळ ? गाडी मिळेल ना ? इत्यादी. अखेर कसाबसा संध्याकाळी ६.१५-६.३० ला स्वारगेटला पोचलो. स्वारगेट-कल्याण गाडी प्रवाशांची वाट बघत उभीच होती. क्षणाचाही वेळ न दवडता माझ्या कल्याण शिवशाहीमध्ये जाऊन बसलो आणि सुटकेचा निःश्वास सोडला. स्वारगेट-कल्याण शिवशाही सुद्धा आरक्षण केलेले प्रवासी न आल्याने अर्धा तास लेट सुटली. गाडी फुल्ल पॅक झाली होती. फक्त ३-४ प्रवासी विना आरक्षणवाले होते. त्यात काही प्रवासी ज्यांचे रिझर्व्हेशन स्वारगेटपासून होते ते वनाजला चढणार, काही चांदणी चौकचे प्रवासी वाकडला चढणार असा सावळा गोंधळ चालू होता आणि यामुळे कंडक्टर पुरते त्रासलेले होते. त्यात बाकी प्रवासी हुज्जत घालणारे होतेच. नुसता राडा चालू होता. ह्या सगळ्या भानगडीत गाडी लेट झाली. पुढे पुण्याचा ट्रॅफिक आहेच. जशी गाडी एक्सप्रेस हायवेला लागली तशी वाऱ्याशी गप्पा मारू लागली. थेट खालापूर टोल नाक्याच्या फूड मॉलला क्षणभर विश्रांती घ्यायला थांबली. लगेच १५-२० मिनिटांत पुढे मार्गस्थ झाली. साधारण रात्री ११ वाजता डोंबिवलीला आली आणि माझा प्रवास संपन्न झाला. पहिल्यांदाच एवढे कट टू कट प्लॅनिंग केले आणि ते व्यवस्थित पार सुद्धा पडले. तर अशी ही डोंबिवली-कराड-डोंबिवली या प्रवासाची गोष्ट कशी वाटली ते जरूर कळवा.

---

# दिशाहीन तरुणाई

**- श्रीमती उज्ज्वला बा. साठे, पुणे.**
**मो. ९८५०८४५६७०**

आजच्या युवा वर्गाबाबत सगळीकडेच चर्चा केली जात आहे. नुसती चर्चा करून चालणार नाही. त्यावर अंमलबजावणी व्हायला पाहिजे. आणि विचार करणे आवश्यक आहे. तरुणाईची सामाजिक जबाबदारी, देशभक्ती, देशप्रेम, वाढतं नैराश्य या गोष्टी का घडत आहेत याचा साकल्याने विचार करायला हवा. महत्प्रयासाने हालअपेष्टा सोसून, घरादारांवर पाणी सोडून ज्यांनी आपला भारत देश ब्रिटिशांच्या शृंखलेतून स्वतंत्र केला, तो सांभाळणे ही युवा पिढीची फार मोठी जबाबदारी आहे. श्रीछत्रपती शिवाजी राजांना जिजाबाईंनी घडवलं तसं घराघरांतून तरुणाई घडली पाहिजे. स्वातंत्र्यानंतरच्या युवा वर्गाने थोडीफार सांभाळली पण त्यांनी त्यांची पिढी घडवायला नको का ? सर्व गोष्टींची जाणीव मुलांना वेळोवेळी करून द्यायला पाहिजे. देशभक्ती, देशप्रेम, सामाजिक जबाबदारी यांची जाणीव करून द्यायला हवी. मुलांना त्यांचं त्यांना करू द्या. स्पून फिडिंग नका करू. आपल्याला मिळालं नाही ते मुलांना मिळावं म्हणून शिक्षणासाठी परदेशात पाठवतात. उच्च शिक्षण घेऊन मुलं आपल्या देशात परत येत नाहीत. तिथल्या सर्व गोष्टींची गोडी लागते. आणि ते परत येत नाहीत. नोकरी करून पालकांना पैसे पाठवले की त्यांची जबाबदारी संपते. पैशांनी सर्व गोष्टी मिळत नाहीत. प्रेम, मायेचा हात हे पैशांनी मिळत नाही. जी मुले आपल्या पालकांसाठी भारतात परत येत नाहीत ती देशासाठी थोडीच परत येणार ? पालक त्यांचं त्यांना करण्यासाठी काही शिल्लकच ठेवत नाहीत. त्यांच्या संसारापासून सर्व गोष्टी तयार असतात. त्यांच्यापुढे ध्येयच काही नसतं. दुसरं म्हणजे हुशार विद्यार्थ्यांचं चीज आपला देश करत नाही. त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना नोकऱ्याही मिळत नाहीत. त्यामुळे परदेशात जाण्याची मुलांची तयारी होते. आपण चार पैसे कमी घेऊन आपल्याच देशात राहून नोकरी करत देशाची सेवा करावी असे मुलांना वाटतच नाही. कारण देशप्रेम, देशभक्ती फारशी नसतेच. आणि त्यागाची भावना नाही. देशात त्यांना काय दिसतं ? तर भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार, कडक शासन व्यवस्था नाही, अन्यायाला पाठीशी घालणं, पैसे खाऊनही चोख काम नाही, त्यामुळे आपल्या देशाबद्दल फारसे प्रेम वाटतच नाही. एकदा परदेशात गेले की तिथले राहणीमान, सुबत्ता ह्यांमध्येच रमतात. त्यांना परत यावंसं वाटतच नाही. 'ने मजसि ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' म्हणणारे स्वातंत्र्यवीर सावरकर कुठे नि कुठे आपण ! परदेशी लोकांच्या चांगल्या गोष्टी आपण शिकलो नाही, नको त्या गोष्टींचं अनुकरण करण्यातच आपली प्रौढी. हाय-फाय, सुटबूट, छानछोकी, रुबाब, पार्ट्या यातच मग्न. ना देशप्रेम, ना देशभक्ती, ना त्याग, काय करते ही पिढी ? आपण काही समाजाचं, देशाचं देणं लागतो असं त्यांना वाटतच नाही. प्रत्येक जण इंग्रजी शाळेत मुलांना घालतो. पालकही घरामध्ये त्यांच्याशी साध्यासाध्या गोष्टीत इंग्रजीत बोलतात. मातृभाषेचे प्रेम मुलांना कसे लागणार ? एकत्र कुटुंब नसल्याने मुलांवर घरांतून संस्कारही होत नाहीत. संस्कारवर्गाला पाठवून कधी संस्कार होतात का ? आत्ताच्या तरुणाईपुढे मी आणि माझं या पलीकडे जगच नाही. त्याचा सुद्धा कधीतरी कंटाळा येणारच. त्यावेळी कोण येणार ? अशा वेळी तरुणाई नैराश्याकडे झुकते. तरुण पिढीला वाचवायचं असेल तर पालकांनो आणि सामाजिक नेत्यांनो, आपली जबाबदारी वेळीच ओळखा !

# भेट तुझी माझी स्मरते...

- चिंतामणी भिडे, ठाणे, मो. ९९३०५ ०८५०६

आज एक वर्ष झालं ह्या घटनेला ! आठवलं की भीती आणि आश्चर्य दोन्ही वाटतं. भीती अशासाठी की जगभर धुमाकूळ घालणाऱ्या कोरोनाने मला गाठलं होतं आणि आश्चर्य यासाठी की मी व कुटुंब त्याला धैर्याने तोंड देऊ शकलो.

चीन या साम्यवादी राष्ट्राच्या पोलादी पडद्यामागे हुआन प्रांतात एका विचित्र विषाणूचा उद्रेक होऊन माणसे पटापट मरताना दाखवणारे व्हिडिओ डिसेंबर २०१९ च्या सुमारास व्हायरल झाले आणि खरंच असं काही आहे की चीनचे हे एखादे षड्यंत्र आहे ह्याची शहानिशा होईपर्यंत जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात ह्या वादळाने जवळजवळ सर्व देशांचे उंबरठे ओलांडले. राष्ट्रीय आपत्ती समजून उपाययोजना करेपर्यंत काही बेजबाबदार, बेफिकीर व्यक्ती व राज्यांमुळे ते भारतात राज्याराज्यात पोचले. फेब्रुवारीत घटना वेगाने घडू लागल्या आणि पहिल्या धक्क्यातून केंद्र सावरेपर्यंत मार्च उजाडला. २२ मार्चपासून देशात संपूर्ण टाळेबंदी घोषित करण्यात आली. सर्व व्यवहार ठप्प झाले. सर्वत्र भीतीचे सावट होते. पावसात भिजलेले पशुपक्षी जसे गपगार होऊन आडोशाला/वळचणीला जाऊन बसतात तसं सर्वांनी घरात स्वतःला कोंडून घेतले. जणू कोरोना एखाद्या अदृश्य आत्म्याप्रमाणे दाराबाहेर घोटाळतोय ! इंग्रजीत ज्याला eerie किंवा scary म्हणतात तसं वातावरण झालं. शोले मधील ठाकूरच्या कुटुंबाची हत्या केल्यावर झोपाळ्याच्या आवाजात दृग्गोचर होणारा भीषण सन्नाटा ! दूध, भाजीपाला आणि औषधे विक्री सुरू होती व बाकी सगळ्या व्यवहारांवर कडक निर्बंध होते. रात्री अन्न शोधायला उंदीर बिळातून बाहेर यावे तशीलोकं जीवनावश्यक वस्तूंसाठी पटकन बाहेर जाऊन येत. घराघरात मास्क, सॅनीटायझर आले. हात वारंवार स्वच्छ धुवा असं वारंवार म्हणत. मास्क, सॅनीटायझर, ऑक्सिमीटर आणि पीपीई कीट बनविणाऱ्या कंपन्यांनी वाहत्या गंगेत हात धुवून घेतले. एप्रिल व मे महिन्यात कोरोनाची लागण झालेले व मृत्यू ह्यांचे आकडे सुरुवातीला चढे व मग काहीसे स्थिर झाले.

जूनच्या दुसऱ्या आठवड्यात सरकारने थोडे निर्बंध शिथिल केले म्हणून मी १० जूनला काही कपडे वगैरे खरेदी करायला तास-दीडतास घराबाहेर होतो. १० जूनच्या रात्रीपासून मला अंग दुखणं व ताप यायला सुरुवात झाली. गोळी घेऊन तात्पुरता उतरणारा ताप परत १०० पर्यंत चढत होता. निर्बंध शिथिल असले तरी सोसायटीत एकही डॉक्टरचा दवाखाना सुरू नव्हता. शेवटी एक दिवस वाट पाहून एका डॉक्टरीणबाईंना फोन केला. त्यांनी सर्व ऐकून घेऊन एक गोष्ट स्पष्ट केली की मी औषधे लिहून देईन पण सरकारच्या सूचनांप्रमाणे आम्हाला प्रिस्क्रिप्शनचा फोटो काढून तुम्हाला सल्ला द्यायचा आहे त्यामुळे तुम्हाला माझी फी ऑन लाईन पे करावी लागेल. चार दिवसांत ताप उतरला नाही तर कोविडची टेस्ट करून घ्या. मनात शंकेची पाल चुकचुकली होतीच, तिने पुन्हा उचल खाल्ली. नशिबाने १४ जूनला ताप उतरला, पुढील दोन दिवस ताप आला नाही. तरी कोविड सेंटरमध्ये जाऊन आलो, पण तिथले डॉक्टर म्हणाले की आता ताप येत नसेल व बाकी काही त्रास नसेल तर नको चाचणी. पुढील ८-१० दिवस आनंदात गेले. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. २३ जूनपासून ताप येऊ लागला. तो १०१ पर्यंत जात होता. सोसायटीत एकमेव वयस्कर डॉक्टरांनी दवाखाना सुरू केल्याचे वृत्त आलं होतं. त्यांचा कोरोनाच्या अस्तित्वावर विश्वासच नव्हता. (बिचारे नंतर कोरोनानेच गेले!) या डॉक्टरांची औषधे सुरू झाली, त्यात ओघानेच प्रतीजैविकेही होतीच. एकीकडे सर्व प्रकारच्या चाचण्याही सुरू होत्या. म्हणावं तसा गुण येत नव्हता. नाईलाजाने २९ जूनला त्यांनी कोविडची चाचणी करण्यास सांगितले. १ जुलैला ती नकारात्मक आली. पण हे समाधानही क्षणभंगुर होतं. कारण छातीच्या एका स्कॅनमध्ये संशयाची सुई पुन्हा कोरोनाकडे वळत होती. ओळखीच्या एका डॉक्टरांनी चार तारखेला आम्हाला कोविडची चाचणी पुन्हा करण्यास सांगितली आणि एकीकडे कोरोना, कोविडची औषधे सुरूच करून हॉस्पिटलमध्ये बेड उपलब्ध होईल का ह्याची चाचपणी सुरू केली. तोपर्यंत ताप येणे मात्र बंद झालं होतं. सात तारखेला चाचणीचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आणि आमच्या काळजात धस्स झालं. गृहविलगीकरण आधीच सुरू होतं, ते तसंच सुरू ठेवावे असे पालिकेला कळविणार होतो, पण पाऊस धो धो सुरू झाला होता. सोसायटीत पाणी साठण्याची भीती होती. ओळखीच्या डॉक्टरांच्या बेड मिळविण्याच्या प्रयत्नांना यश आलं आणि माझी रवानगी हॉस्पिटलमध्ये होणार हे निश्चित झालं. पालिकेच्या डॉक्टरांच्या संपर्कात असल्याने मला न्यायला वाहन येईल असं ते म्हणाले, मोफत ! (क्षणभर यमाने रेडा पाठवतो असं म्हणावं तसं वाटलं.) माझा फोन नंबर ड्रायव्हरला व त्याचा मला दिला गेला. रात्री १०.३० ला ड्रायव्हरचा फोन आला किती वाजता येऊ म्हणून. माझी तयारी होईस्तोवर ११.३० होणार होते, त्या सुमारास त्याला बोलावले व उगीच बभ्रा नको म्हणून बसस्टॉपवर ये म्हटलं तर तो म्हणाला मी तुमची इच्छा असली तरी पुढे येऊ शकणार नाही. मला कळेना, जाऊ दे म्हटलं, कळेल नंतर. ११.३५ ला बसस्टॉपवर आलो आणि पाहतो तर एका मिनी बसला ॲम्ब्युलन्स बनविलेली ! एका टोकाला ड्रायव्हर दुसऱ्या टोकाला मी, मधल्या सीटस् काढून टाकून बेड केलेले. मध्ये प्लास्टीकचे पडदे ! रस्ते सामसूम. मी पुढे काय वाढून ठेवलंय असं विचार करत बसून राहिलो. १० मिनिटात बस हॉस्पिटलच्या दाराशी. तत्पूर्वी मुलीचे लग्न करायचे ठरवलं होतं, म्हणून पत्रिका पाहणे वगैरे सुरू झालं होतं. एक ठाण्यातीलच मुलाची पत्रिका आली होती. माझ्या आजारपणातच मुलाची व मुलीची पत्रिका जुळतेय असं कळलं होतं. पुढील बोलणी कधी व कशी करायची ह्याचा विचार सुरू करण्याआधी घरात आजारपण नसणं आवश्यक होतं. ११ जूनपासून माझ्या सेवेत गर्क असलेल्या माझ्या सौ.ला व मुलीला २९ जून नंतर नैराश्य, भीती आणि काळजीने घेरलं. पहिला चाचणीचा निकाल नकारात्मक आला तेव्हा सगळ्यांनाच हायसं वाटलं. हायसं, काय मजेशीर शब्द आहे ! हाय आणि हायसं, फक्त एका 'स' या अक्षराचा फरक ! पण एकात भय तर दुसऱ्यात अभय आहे. सात जुलैला माझ्या दुसऱ्या चाचणीचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आणि आम्ही सगळेच काळजीत पडलो. एक म्हणजे त्यांनाही चौदा दिवस घरी राहून चाचणी करावी लागणार होती. दुसरं म्हणजे माझं पुढे काय आणि तिसरं, लग्नाची बोलणी पुढे कशी न्यायची ? मी एकटाच जेव्हा हॉस्पिटलला जायला निघालो तेव्हा मी दृष्टीआड होईस्तोवर त्या दारात उभ्या होत्या हात हलवत !

जिवाची किती घालमेल झाली असेल ह्याची मी कल्पना करू शकत नाही. ती त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. मी शांत आहे, चालत जातो आहे, मला ताप नाहीये ह्याचं समाधान मानावं की कोरोनामुळे मी हॉस्पिटलमध्ये जातोय ह्याचं दुःख ! माझा हा शेवटचा निरोप तर नसेल ना ?

हॉस्पिटलच्या गेटवर मला सोडून ती भली मोठी ॲम्ब्युलन्स निघून गेली. ड्रायव्हरला मी धन्यवाद दिले. त्यानेही लवकर बरे होण्याच्या सदिच्छा दिल्या. पाच मिनिटात सिक्युरिटीने फोनाफोनी करून मला कुठे जायचे ते सांगितले. बाराला दहा मिनिटे कमी होती. लिफ्टसमोर चार खुर्च्या ठेवलेल्या होत्या. एक माणूस आला, पीपीई कीटमधील वॉर्डबॉय असावा. खुर्च्यांवर सॅनिटायझर मारून मला बसण्यास सांगून निघून गेला. मला चौथ्या मजल्यावर जायचं होतं पण एकट्याने जाण्याची परवानगी नव्हती. मला न्यायला (?) कुणीतरी येईल असं सांगण्यात आलं होतं. खुर्चीत बसल्या बसल्या अर्धा ते पाऊण तास मी लिफ्ट वर खाली जाताना पाहात होतो. सगळे पीपीई कीटच्या पांढऱ्या आवरणात ! चान्द्रयानातून माणसे यावीत तशी ही पांढरी भुते लिफ्टमधून ये-जा करत होती. एरवी रात्री बाराच्या सुमारास ही अशी माणसे दिसली असती तर मनात नक्कीच भूताखेतांचे विचार आले असते. पण आज मनाला हे फालतू विचार करायला वाव नव्हता. आता भीती ही 'भूता'ची नव्हती तर 'भविष्याची' होती. त्याआधी घरून दोनदा तीनदा फोन येऊन गेले. माझी खुशाली विचारायला व मला धीर द्यायला. शेवटी बारा चाळीसला लिफ्ट खाली आली व दोन पांढऱ्या आकृत्या व्हील चेअर घेऊन बाहेर आल्या. पीपीई कीटमुळे कळत नव्हतं पण एकूण आकृतिबंधावरून एक वॉर्डबॉय व एक नर्स असावी असं वाटत होतं. व्हीलचेअरमुळे मला वाटलं की कुणी जास्त आजारी किंवा वयस्कर व्यक्ती येत असावी, पण ते दोघे माझ्याच समोर येऊन उभे राहिले. नावगाव विचारून झाल्यावर ग्लोव्हज घातलेल्या हाताने माझी छत्री व बॅग घेऊन मला व्हीलचेअरवर बसा असं सांगितलं. 'अहो मी चालू शकतोय, ह्याची गरज नाही' असं म्हणताच 'आम्हाला तशा सूचना आहेत' असं त्यांनी निक्षून सांगितल्यावर मी नाईलाजाने बसलो. म्हणजे इतका वेळ मी इम्पेशंट होतो आता पेशंट झालो. माणसाला धीर देणं सोडा, त्याला मानसिकरित्या रुग्ण करण्याची पूर्ण तयारी होती !! लिफ्ट चौथ्या मजल्यावर जाऊन मी स्थिरस्थावर होईपर्यंत मी मनात निश्चय केला, काही झालं तरी नैराश्य येऊ द्यायचं नाही. 'मनः प्रसादे परमात्म दर्शनम्' परमात्म दर्शन जाऊदे, मन प्रसन्न ठेवायचं, हास्य विनोद करायचे. सगळे सोपस्कार आटपून हॉस्पिटलचे कपडे अंगावर चढले आणि दात घासून मी बेडवर आडवा झालो. दिवसभरच्या धावपळी, फोनाफोनी करून मानसिक थकवा आला होता. क्षणात झोप लागली. तेवढ्यात एक पांढरं भूत आलं मला उठवायला. ही बया (जवळ आल्यावर कळलं बया आहे ते ) मला रोज रात्री घेतो ती गोळी द्यायला आली होती ! मी म्हटलं, माई आई (मनात) पहाटेचे दोन वाजलेत, काल रात्री घ्यायची गोळी मी घरून घेऊनच आलोय. ती म्हणाली, हो का, ठीक आहे. झोपा आता काका'. एक तर माझी चांगली झोप मोडली आणि वरती 'काका' म्हणून जखमेवर मीठ चोळतेय ! दातओठ खात मी झोपलो तो एकदम 'काका, स्पंजिंग' ह्या आरोळीने दचकून जागा झालो. पाहतो तर पावणेसहा वाजले होते व माझं हॉस्पिटलचे रुटीन सुरू झालं होतं. मला ट्वीन शेअरींग रूम मिळाली होती. स्पंजिंगच्या आरोळीने उठल्यावर मी तोंड धुवून, दात घासून घेतले. अंघोळीची सोय आहे कळल्यावर स्पंजिंग नको सांगितलं. चहा कधी मिळेल ? असा प्रश्न माझा रक्तदाब तपासायला आलेल्या एका नर्सला विचारलं. 'येईल आठ-साडेआठ पर्यंत नाष्ट्या बरोबर' असं उत्तर मिळालं. कपाळाला हात लावला. उठल्यावरचा पहिला चहा साडेआठ वाजता ? कठीण आहे ! सकाळची पहिली निराशा पदरी पडली. आलिया भोगासी म्हणत गरम पाणी मागितलं. नशिबाने मला खिडकीजवळचा बेड मिळाला होता. दुसऱ्या बेडला ऑक्सिजनची सोय भिंतीवर होती. माझ्या ऑक्सिजनचे प्रमाण पहिल्या रात्रीपासून ९७-९८ होतंच. एकदा तर ऑक्सिमीटर नर्सने लावला आणि ऑक्सिजन ९७ पासून सुरू झाला तो वाढत वाढत ९९ पर्यंत गेला. तेव्हा राऊंडवर असलेले डॉक्टर 'बास बास. फुटेल आमचा ऑक्सिमीटर'! असं हसत हसत म्हणाले. खिडकीजवळ होतो म्हणून मी पडदा उघडून बाहेर पाहू शकत होतो. आषाढ सुरू होता, पण आकाश मोकळं होतं. थोडी मान उंचावली तर बाहेर जवळच एक बाग व देऊळ दिसलं. जरा मनाला बरं वाटलं. एक चांगलं झालं की माझा फोन माझ्याकडेच ठेवू दिला होता. एव्हाना माझ्या हॉस्पिटलमध्ये येण्याची बातमी सोसायटीत कळली होती कारण पालिकेने घरावर तसा बोर्ड लावला होता आणि सौ व मुलगी, दोघींनाही १४ दिवस स्थानबद्ध करून कोरोनाची चाचणी करण्यास सांगितली होती. सगळ्यांचे फोन येऊ लागले, काळजी करू नका, काळजी घ्या, आम्ही आहोत त्या दोघींना काही लागलं तर इत्यादी. इतर मित्र-मैत्रिणींचेही फोन आले. फोनमुळे मी संपर्कात होतो, फोनवर पेशन्स खेळायचो, नेटवर वाचन करायचो आणि व्हॉट्सॲप विद्यापीठ होतंच ! ठरावीक वेळी नर्स, वॉर्डबॉय, डॉक्टर यायचे, त्यांची योजून दिलेली कामे करून निघून जायचे. या पीपीई किटने सगळी पंचाईत करून ठेवली होती. कोण येतंय हे कळायचंच नाही. पीपीई कीट हे एकाच साईझचे असल्याने शरीराला नको तिथे आणि नको तेवढी वळणे असायची. येणारी व्यक्ती 'ती' आहे की 'तो' आहे, काहीच कळायचं नाही. एकदा दोनदा तर मी 'मॅडम' म्हणून हाक मारली तर ते 'सर' निघाले ! म्हणजे रक्तदाब मोजायला सुहास्य वदना येवो किंवा न येवो, रक्तदाब वाढतोय कशाला ? पीपीई कीट घालून हवाई सुंदरी होण्याच्या लायकीची कुणी दवाई सुंदरी असली तरी कळायला मार्ग नव्हता. रुम मधील दुसऱ्या रिकाम्या बेडवर कुणी दुपारपर्यंत येईल असं कळलं. मनात म्हटलं कुणी मराठी, समविचारी, समवयस्क आलं तर बरं आणि त्यातही परत निव्वळ कलात्मक दृष्टीने पाहता येईल असं कुणी आलं तर सोन्याहून पिवळं ! पण छे, कसलं काय, एक ७२ वर्षांच्या आजी आल्या. स्त्रियांसाठी राखीव बेड रिकामा होईपर्यंत त्या तिथे होत्या. त्यांना आक्सिजन लागत होता मधूनच. त्या संध्याकाळी दुसरीकडे गेल्यावर एक रक्तदाब, मधुमेह दोन्ही व्याधी असणारे ५४/५५ चे डॉक्टर आयसीयूमधून तिकडे आणले गेले. त्यांच्या एकूण बोलण्यावरून ते यमाचा दरवाजा ठोठावून आले होते. त्यांची चार हॉस्पिटल्स, ऐरोलीत अनेक रो हाऊसेस, गावात बंगला होता. बायको वकिली करत होती, मुलगा मुलगी अमेरिकेत, हे स्वतः पालिकेच्या हॉस्पिटलमध्ये मोठ्या पदावर ! डॉक्टर दोन दिवस माझ्या बरोबर होते, किशोरकुमार आणि जुनी हिंदी गाणी यांचे चाहते होते. त्यांच्या आग्रहाखातर मी एक किशोरचे गाणेही गाऊन दाखवले होते त्यांना. आयसीयूमधून बाहेर येताच त्यांना पदोन्नतीची बातमी मिळाली. जिल्ह्यातील पालिकेची सर्व रुग्णालये त्यांच्या अधिपत्याखाली आली. ह्या आनंदात ते फोन करत आणि फोन घेत होते. एवढं सगळं असूनही माणूस संतुष्ट नव्हता. केंद्र सरकारकडून कोविडच्या

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

प्रत्येक रुगणामागे सव्वा ते दीड लाख मिळतात म्हणून त्यांना आपली हॉस्पिटल्स कोविड सेंटरमध्ये बदलायची होती. त्यासाठी ते सेक्रेटरीला फोनवरून अर्जाचा मसुदा सांगत होते. मला सखेद आश्चर्य वाटले. जवळजवळ मृत्यूच्या दारात जाऊन आले तरी लोभ सुटत नव्हता ! पुढे महिन्या, दोन महिन्यांनी त्यांना व्हेन्टिलेटरच्या खरेदी व्यवहारात लाच घेताना रंगेहात पकडण्यात आलं अशी बातमी वाचली. का ? कशासाठी हे ? काय कमी होतं त्यांना ? पण विनाशकाले विपरीत बुद्धिः दुसरं काय ? शिक्षण होतं पण संस्कार कमी पडले हेच खरं ! रात्री त्यांना झोप आली नाही तर मोठ्या आवाजात टीव्ही लावायचे. मला सांगावे लागे की डॉक्टर आवाज लहान किंवा म्यूट करा. मला झोपू द्या म्हणून ! भरीस भर म्हणून आमच्या मजल्यावरून रात्री एका बाईंची खूप आरडाओरड आणि कधीकधी किंचाळणं, रडणं ऐकू येई. मी नर्सला विचारलं की काय त्या वेड्याबिड्या आहेत का ? तर ती म्हणाली की नाही, त्यांना इथे राहायचं नाहीये. नळ्या वगैरे काढून टाकतात त्या. शेजारच्या बेडवर डॉक्टर दोन दिवस होते. मग दोन दिवस आणखी एक वयस्कर गृहस्थ आले. पण त्यांचा काहीही त्रास नव्हता. ह्या सगळ्या वातावरणात चौथ्या दिवशी मनाला उभारी देणारी बातमी कळली म्हणजे सौ. व मुलगी दोघींच्या चाचण्यांचा रिपोर्ट नकारात्मक आलाय ! सहा दिवस कसेतरी गेले. मी डॉक्टरांच्या मागे लागलो होतो की मी ठीक आहे मला सोडा घरी म्हणून. शेवटी सातव्या दिवशी सर्व चाचण्या होऊन त्यांचे निकाल चांगले आहेत म्हटल्यावर माझी सुटका झाली आणि १३ जुलै २०२० ला संध्याकाळी मी घरी परत आलो. **Home Sweet Home** ! माझी कोरोनाशी नेमकी भेट कधी झाली ? १० जूनला की १ जुलैला हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. पण कोरोनाशी झालेली ही भेट मात्र कायम स्मरणात राहील !

**पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे,**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**

**साप्ताहिक प्राजक्त**

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS